# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

# संवाद

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥

**Vol.- 8** **Issue 3** सप्टेंबर - २०१५ **September 2015**


## संपादकीय

प्रिय सभासदमित्रांनो,

महाराष्ट्रातील सर्व आबालवृद्धांचा आवडता गणेशोत्सव सर्वत्र आनंदी वातावरणात साजरा होत आहे. मराठी माणूस जगात सर्वदूर कुठेही वास्तव्यास असला तरी त्याच्या घरात गणेश चतुर्थीला ह्या गणेशाची स्थापना होतेच. तसे पाहता गणेश ही फार प्राचीन देवता आहे. देशापरदेशात असलेली अनेक गणेशमंदिरे तो परमेश्वर सर्वत्र आहे ह्याचीच साक्ष देतात. सर्व धर्मातील देव-देवतांनी तुमच्या आमच्या प्रेमापोटीच जनांच्या उद्धारासाठी मानवी देह धारण केला आहे. तो आमच्या प्रत्येकाच्या मनात वास्तव्यास आहेच. त्याला गणेशही अपवाद नाही, म्हणून त्याचे पूजन आपण गणेश चतुर्थीला करतो. सर्व गणांचा-समुदायाचा ईश म्हणून तो 'गणेश' व सर्व गुणांचा ईश म्हणून तो 'गुणेश'. गणपती अथर्वशीर्षात व इतर स्तोत्रातून श्रीगणेशाचे स्वरूप वर्णन व स्तुती सर्वांना माहीत आहे. खरे पाहता मानवात वसत असलेल्या अत्त्युच्च गुणांचेच हे रूप आहे. मानवात असलेली ही सृजनत्त्वाची शक्ती, ज्ञान, सौंदर्य, आदर, कृतज्ञता, आकांक्षा, बुद्धिमत्ता, कल्पनाशक्ती, विचारशक्ती, प्रेरणाशक्ती, प्रेम, प्रज्ञा, बलवत्ता, धैर्य, तारूण्य, शौर्य, नम्रता, निश्चय, शांती, न्याय, दयाशीलता, दक्षता, उत्साह, संतोष हे सर्व त्या गणेशाचे गुण त्याने मानवाला प्रदान केलेले आहेत. ह्याचाच अर्थ हा सर्व गुणांचा ईश असलेला 'गुणेश' प्रत्येकाच्या हृदयात आहे, प्रत्येकाच्या शरीरात आहे. प्रत्येकाच्या अस्तित्वात आहे, प्रत्येकाच्या मनात आहे. गणेशाबद्दलच्या भक्तीभावामुळेच,आपल्यात असलेल्या त्याच्या गुणांमुळेच, ज्येष्ठहो, आपण सर्वजण त्या परमेश्वराकडे जाण्याच्या मार्गावर आहोत होय नां?

ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास आदी संत महात्मे, तसेच अनेक थोर शास्त्रज्ञ, साहित्यिक, विचारवंत, द्रष्टे पुरूष, समाजधुरीण ही सारी त्या घनिभूत परमेश्वराचीच रूपे नाहीत का? आपणासर्वांची इच्छा ह्या अवघ्या पृथ्वीचे नंदनवन व्हावे हीच आकांक्षा आहे. म्हणून

''सर्वेऽपिसुखिन: सन्तु। सर्वे सन्तु निरामया:।
सर्वे भद्राणि पश्यंतु। मा कश्चित दु:खमाप्नुयात।।''

ही आपली पूर्वापार प्रार्थना असते.

परंतु आज सर्वत्र आपल्याला काय चित्र दिसते? क्रूरता, भ्रष्टाचार, संपत्तीची हाव, गलिच्छ राजकारण, स्वत:चा अहंभाव, आजार, ताणतणाव, नैराश्य, भीती असे अनेक अवगुण मानवाने स्वत:च्या स्वार्थापोटी स्वत:वर ओढून घेतलेले आहेत.

म्हणूनच आत्मसंयमन, चांगल्या लोकांचा सहवास, स्वत:ला बदलण्याची इच्छा ह्या गुणांमुळे ह्या दुर्गुणांचे परिवर्तन सद्‌गुणात होऊन माणूस परम् पदापर्यन्त पोहोचू शकतो, म्हणजेच वाल्याचा वाल्मिकी होऊ शकतो.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने आपण लक्षात ठेवावयास हवे की सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे भव्य मंडप उभारून, रस्ते अरुंद करणे नव्हे, उंच उंच गणेशमूर्तींची स्पर्धा निर्माण करून ताणतणाव निर्माण करणे नव्हे; त्या गणेशाला लाखो रूपयांचे दागिने घालून पैशाची उधळण करणे नव्हे, किंवा अनंत चतुर्दशीच्या दिवशी ३०/३५ तास मिरवणूक काढून समाजाला वेठीस धरणे नव्हे. म्हणून घरोघरी पूजिल्या जाणाऱ्या गणेश-पूजनाला सार्वजनिक उत्सवाचे रूप देण्यामागे लोकमान्य टिळकांचा समाजात जागृती, ऐक्य व परस्परात सद्भाव निर्माण करण्याचा उदात्त हेतू होता. या गोष्टींची समाजाला सदासर्वकाळ गरज असते. ही गोष्ट लक्षात घेऊन अनिष्ट प्रथा व प्रवृत्तींचा त्याग करून सार्वजनिक गणेशोत्सवाला समाजसुधारणेचे, राष्ट्रीय जागृतीचे व लोककल्याणाचे प्रभावी साधन बनविणे व त्यासाठी विविध उपक्रम राबविणे आपले कर्तव्य ठरते.

थोडक्यात ज्ञानेश्वरीतील पसायदानातून विश्वाला मिळालेला संदेश हा गणेशरूपी ज्ञानेश्वर नावाच्या अत्त्युच्च विचाराच्या मानवानेच आपल्याला दिलेला आहे. त्याचे पालन करणे म्हणजेच गणेशोत्सव. मानवाला ही सद्‌बुद्धी लवकर प्राप्त होवो हीच गणेशचरणी कृतज्ञतापूर्वक प्रार्थना.


शरद शिंगवेकर
मो.९४०५०२६४१२

(सन २०१४ - २०१५ च्या कै. वा. वि. गंधे व श्रीमती उमाबाई गंधे पुरस्काराचे मानकरी श्री. पी.ए.लोपीस, रिजनल सेक्रेटरी, वसई, पालघर, यांचे मनोगत आम्ही देत आहोत. श्री लोपीस यांनी दि. २३/८/२०१५ रोजी नागपुर येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आपल्या असोसिएशनला रु.५००१/- ची देणगी दिली आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. - सेक्रेटरी)

## ऋणनिर्देश

असोसिएशनच्या माझ्या पहिल्याच सभेत ज्यांच्या दारात माझा अंगठा चिमटल्यावर मलमपट्टी करणाऱ्या ठाण्याच्या सौ.खरे वहिनी व तदनंतर मैत्री जपणारा खरे, नीला व ताम्हाणे भगिनींची साथ, दादरचे म्हात्रे, हृदयाला साद घालणारा कै.शहाणे, बेळगावचा उचगावकर, पुसाळकर, आगरकर, नाडकर्णी, बुटाला व छाब्रिया यांचा स्नेह, दहिसरच्या दातेचं निर्व्याज प्रेम.

फोनवर बोलतांना निर्भेळ आनंद देणारे पुण्याचे लळिंगकरसाहेब, 'संवाद'च्या संदर्भात भरभरून सहकार्य करणारा अविनाश देशपांडे, गंमतीने स्नेह जपणारे 'संवाद'चे आठवले, मिश्किल स्वभावाचा पंडित, 'बर्थ-डे' स्पेशालिस्ट चाटे, ऋग्वेदातील वचनं उद्धृत करून माझ्यासाठी दयाघनाकडे याचना करणारे बर्वेसाहेब, नागपूरहून माझं अभिनंदन करणारे वकीलसाहेब, आपुलकीने वागणारे प्रभुदेसाईसाहेब, प्रोत्साहन देणारे कै.कुड्डियाडीसाहेब, सुंदर पत्राने अभिनंदन करणारे पुण्याचे पालकरसाहेब, अल्प सहवासातही हातचे काहीही राखून न ठेवणारे कै.गद्रेसाहेब, मराठवाड्यातल्या मातीत ज्यांच्याशी मैत्री झाली ते तम्मा पाटील व विलास गंधे !

गोव्याच्या AGM चं न चुकता आमंत्रण देणारे नारकरसाहेब व डायस, वसई-विरार-पालघर-डहाणू येथील माझे पेन्शनर बंधू, मुंबई सकलचे आपले पेन्शनर्स, स्टेट बँकेतला माझा मित्रपरिवार.

धराधर यांचा आवर्जून आवडणारा प्रेमळ धाक, कामं करा अशी गोड दटावणी देणारा व सिनियर असतांनासुद्धा एकदा रेल्वे प्रवासात माझ्याकरिता नाश्ता आणून मला लाजवणारा राजिवडेकर! कुठल्याही दिवशी आणि कुठल्याही वेळेला न चिडता फोनवरून मार्गदर्शन व समजावणीच्या सुरात बोलणारे एस्.बी.गोखलेसाहेब, पहिल्यांदाच शिवाजी मंदिर, दादर येथील वार्षिक सभेचे सूत्रसंचालन केल्यावर ज्यांच्या डोळ्यात केवळ कौतुकच दिसलं व जे मी आजही माझ्या आठवणीत साठवून ठेवलं आहे ते दांडेकरसाहेब व ज्यांच्या आदेशानुसार मी ह्या असोसिएशनमध्ये प्रवेश केला व ज्यांचा वरदहस्त आजही माझ्या डोक्यावर आहे ते माझे प्रेरणास्त्रोत वि.म.गोखलेसाहेब !

आणि या वाटचालीत न कुरकुरता साथ देणारी माझी पत्नी !

या सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद ! अनवधानाने एखादा उल्लेख राहिला असेल तर त्याबद्दल मनापासून क्षमस्व !

*पी. ए. लोपीस,* रिजनल सेक्रेटरी (वसई-पालघर)

## Our W.P. No.1875 of 2013 being heard at Delhi High Court - Latest position

Our Federation has advised the latest position in respect of our W.P. No.1875 of 2013 being heard at Delhi High Court as under.

The W.Ps listed under 'Regular Matters' for final hearing are taken up by the Delhi High Court only after the completion of hearing of the W.Ps for admission as fresh cases or after 'notice matters'. The hearing of such admission matters takes almost the entire time of the Court on most of the days and only a limited time is available when W.P. under 'Regular Matters' reaches the board. The hearing of the W.Ps listed with the seniority above W.P. under 'Regular Matters' has since been completed. In the 'cause list' as on date, our above W.P. has been listed as the 'First item' under 'Regular Matters' by the Delhi High Court. We therefore expect the Delhi High Court to take up our W.P. immediately on completion of cases listed under the 'Advance Matters' on any of the week days. Our Advocates are closely following up the proceedings and will submit their arguments in support of the prayers made in our above W.P. We are constantly monitoring the position and keep you advised of the developments.

## Proposal dated 27-04-2015 submitted by our Bank to the Govt - regarding Updation of Pension

As regards the proposal dated 27-04-2015 submitted by our Bank to the Government, we understand that further discussions would be held by the officials of the Corporate Centre of our Bank with the officials of the Finance Ministry, after securing the approval for the revision of our pension on 10th Bipartite pay scales. We shall advise immediately on receiving the communication on the decision taken by the Government.

***- P.P.Sankaranarayana Murthy,***
General Secretary
Federation of SBI Pensioners' Associations

## Obituary

I am extremely sorry to advise that Shri.Vasant Raghunath Kuddyady, former President of our Mumbai Zonal Sub-Centre and Vice-President of Mumbai Circle Pensioners' Association passed away at Mumbai (Andheri) on Tuesday, the 18th August 2015.

Late Shri. Kuddyady (B.Com.,LL.B., C.A.I.I.B.) was born on 15.1.1927. He joined Imperial Bank of India in 1953 as a Clerk and retired on 31.1.1987 as Asst. General Manager. He worked in various Branches / Offices viz. Byculla, Saki Naka (Mumbai), Dahanu, Palghar, Gwalior, A.O. (Rehabilitation), E&T Dept. (In-Charge), Mumbai LHO, O&M Dept. in Central Office etc.

Those days (in 1987) late Shri.S.S.Pandit was doing the work of enrolment of Members of Pensioners' Association. I also retired on 28.2.1987 and started helping Shri.Pandit. Later on sometime in October 1987, we (i.e. Shri.Pandit, Shri.Kuddyady and myself) thought to establish a Zonal Sub-Centre in Mumbai covering Mumbai, Thane and Raigad Districts.



The Zonal Sub-Centre was established on 23.1.1988 and Shri.Pandit, Shri.Kuddyady and myself were elected as President, Vice-President and Secretary respectively.

On the 25th August 1988 our Pension Scheme was revised (effective from 1.1.1987) and our work also increased. New Family Pension Scheme was also introduced. It was a great task to search the beneficiary of Family Pension. In this area Shri.Kuddyady and Shri.Pandit did Yeoman's Service to Family Pensioners. On 15.6.1991 Shri.S.S.Pandit died. Therefore, Shri.Kuddyady was elected as President of the Mumbai Zonal Sub-Centre. He retired from that post on 6.3.2000.

Immediately after joining Committee, he started enrolling members. On account of enrolling highest Membership and also collection in 1993 he was felicitated by Shri.B.R.Gadre, President of Circle Association. He did this work till retirement from the post of President.

From 1989 to 14.7.2000 he was also Vice-President of the Circle Association. During first ten years of Mumbai Zonal Sub-Centre he enrolled 453 Members and collected Rs.5,37,250/- and this was the highest amongst all committee members.

From 1988 to 1999 he had helped me by participating in discussions I had with officials of Central Office (including Chairman) and LHO. During this time he was Governing Body member of the Federation.

Shri.Kuddyady used to meet several Pensioners regularly and attend to their grievances relating to Pension / Family Pension.

As Bank's Chairman Shri. D.N.Ghosh, IAS, was to retire shortly. I alongwith Shri.V.R.Kuddyady met him in his office on 11.4.1989 at 3.15 p.m. We thanked him for doing revision of Pension and introduction of Family Pension Scheme both w.e.f. 1.1.1987. We extended to him our invitation to attend our Association's Annual General Meeting to be held at Pune on 5.5.1989. However, he expressed his inability as the month of May 1989 was the last month of his service in State Bank of India. He retired on 12.5.1989.

Shri.Kuddyady suggested that we should felicitate Shri.D.N.Ghosh at his residence. Accordingly, on 19.5.1989 I talked to ex-Chairman over phone. He said "Why you want to felicitate me and that too when I have retired from Bank's Service?" He added that "people salute the 'rising sun' (i.e. person in the Chair), whereas now I am no more the Chairman of the Bank." I told him that he has done such work that no Pensioner will forget him. Finally he agreed. Next day i.e. on Saturday,

20.5.1989 at 10 a.m. we (i.e. Shri.Kuddyady, Shri.Pandit and myself) met Shri.Ghosh at his residence 'Dunebin' at Malbar Hill and felicitated him. About one hour we were there.

For the excellent work done by Shri.Kuddyady, our Association honoured him by presenting "Late Shri.L.N.Pabalkar Memorial Gold Medal" for the year 2002-2003. A "Scroll of Honour" and the "Gold Medal" were presented to him by me as President of the Circle Association. He was felicitated in the AGM held at Kolhapur on 29.5.2003.

I now missed my friend, colleague & guide for ever. However, I will always remember the moments spent with him.

I offer my heartfelt condolences to the bereaved family of late Shri.V.R.Kddyady and pray to the Almighty to bestow the strength and courage
on them to bear the loss.

**"May his Soul Rest in Peace"**

- *B.G.Dandekar,* Thane
9869043161

* * * * * *

## युनिट वार्ता

**सांगली युनिट -**

सांगली युनिटची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १६ जुलै २०१५ रोजी सांगली येथे संपन्न झाली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन सभेस सुरुवात झाली.

गतवर्षी दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या तसेच नवीन सभासदांचा/सहसभासदांचा सत्कार करण्यात आला.

सचिव श्री. सुरेश छत्रे यांनी मागील वर्षाच्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत सादर केला व सभासद संख्या ४०४ झाल्याचे सांगितले. गतवर्षी ४ सभा घेण्यात आल्या. तिळगूळ समारंभ व श्री. गाडगीळ बुवा यांचे गायनाचे कार्यक्रम झाले. मार्केटयार्ड सांगली शाखेने प्रथमच निवृत्तीवेतनधारकांची सभा घेतल्याचे सांगितले. युनिटकडे रु. ५००००/- चा कॉर्पस फंड जमा असल्याने सर्वांनी आनंद व्यक्त केला. खजिनदार श्री. साठे यांनी वार्षिक ताळेबंद सादर केला.

श्री. मेहता यांनी युनिटच्या स्थापनेपासूनच्या कार्याचा आढावा घेतला. श्री. पी. एन. माळगे यांनी विविध कोर्ट केसेसची माहिती दिली व आपले मत व्यक्त केले. श्री. ताम्हणकर यांनी सांगली येथे स्थापन करावयाच्या दवाखान्याच्या कामाच्या प्रगतीबद्दल माहिती दिली व पदाधिकाऱ्यांना पाठपुरावा करण्याची विनंती केली.

श्री. विलास गंधे (सचिव, मुंबई सर्कल) यांनी युनिटच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करून बऱ्याच मुद्द्यांना समर्पक उत्तरे दिली व 'संवाद'साठी प्रत्येकी रु. १०००/- ची देणगी देण्याचे आवाहन केले. सभासदांच्या विधायक सूचनांचा अवश्य विचार करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

श्री. सी. पी. कुलकर्णी (अध्यक्ष, पुणे झोनल सब सेंटर) यांनी सांगली येथील दवाखान्याच्या संदर्भात पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

श्री. अशोक पंडित (सहसचिव, पुणे झोनल सब सेंटर) यांनी देखील सभेस मार्गदर्शन केले. श्री. अनिल ताम्हणकर यांनी आभारप्रदर्शन केले. सभा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्वश्री सहस्रबुद्धे, व्ही. जी. माने, घेजी, डि. जी. शिंदे, वसंत बेडेकर, रामभाऊ सातपुते, चंद्रकांत मोहिते, अशोक चव्हाण, मेहता, माळगे, करमरकरजी, गोसावी, सौ. कवठेकर, सौ. सोले यांनी विशेष परिश्रम घेतले.

सभेची सांगता 'पसायदाना'ने झाली. सर्व उपस्थितांनी भोजनाचा आस्वाद घेतला व नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**सुरेश छत्रे,**
**सचिव**

* * * * * *

**अमरावती युनिट -**

अमरावती जिल्ह्यातील सदस्यांसाठी दि.१५ व १६ जुलै २०१५ रोजी अमरावती येथील प्रसिद्ध 'बाहेती हॉस्पिटल' येथे मेडिकल चेक-अप कॅम्प घेण्यात आला. यामध्ये २५/३० सदस्यांनी भाग घेतला तसेच डॉ.बाहेती यांनी योग्य ते मार्गदर्शन व सूचना दिल्या.

या कॅम्पसाठी अमरावती युनिटचे अध्यक्ष श्री.शंकर बानोकार, श्री.निमदेव, श्री.खोब्रागडे, श्री.बाळासाहेब काळे, यांनी सहकार्य केले. श्री.शिरिष झंवर यांनी विशेष सहकार्य केले.

युनिटचे वार्षिक स्नेहसम्मेलन दि.१४ मार्च २०१५ रोजी अमरावती येथील 'जोग हॉल' येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या स्नेहसम्मेलनाला अमरावती झोनचे क्षेत्रीय व्यवस्थापक श्री.अक्षय तिवारी तसेच कॅम्प शाखेचे अे.जी.एम. श्री.राजेश सेठ हे उपस्थित होते. सम्मेलनास सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हे सम्मेलन यशस्वी करण्यासाठी युनिटचे अध्यक्ष श्री.बानोकार, श्री.निमदेव, श्री.खोब्रागडे, श्री.जर्कत, श्री.चांडक, बाळासाहेब काळे व इतर सदस्यांचे योगदान लाभले.

प्रकाश वाळके,
सेक्रेटरी

* * * * * *

**सोलापूर युनिट -**

सोलापूरातील पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय व स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन सोलापूर युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने बँकिंग रिक्रूटमेंट परिक्षांच्या पूर्वतयारीचे दोन आठवड्यांचे मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. नजिकच्या भविष्यकाळात बँकेतील कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात सेवानिवृत्ती होणार आहे.

लाभार्थी विद्यार्थ्यांनी सदर उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आभार मानले.

'जगण्याच्या शर्यतीत उडणाऱ्या पक्षाच्या पंखांना बळ देण्याचे काम तुम्ही करत आहात' असे मत काही जणांनी व्यक्त केले.

दि.१० जुलै रोजी बाळीवेस शाखेत दुपारी ४ वाजता माधवबाग कार्डीयाक क्लिनिक्स तर्फे सम्पूर्ण हृदयरोग चिकित्सेवर व्याख्यान आयोजित केले होते. संस्थेचे समन्वयक श्री. अलाट यांनी प्रास्ताविक केले. पेन्शनर्स असोसिएशनतर्फे श्री. लावणीस यांनी माधवबागच्या उपस्थित कर्मचाऱ्यांचे तसेच मुख्य व्याख्यात्या डॉ. श्वेता सरडे यांचे स्वागत केले व खोपोली येथील कार्याचे व उपचारांचे कौतुक केले.

सर्व उपस्थित सभासदांनी माधवबागच्या सदर उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले व हा उपक्रम राबविल्याबद्दल स्टेट बँक पेंशनर्स असोसिएशन सोलापूर युनिटला धन्यवाद दिले.

टी. एम. पाटील, सेक्रेटरी

* ****** *

**डोंबिवली-कल्याण युनिट -**

डोंबिवली-कल्याण येथील सभासदांनी दि. २१ मार्च २०१४ रोजी 'एस.बी.आय. पेन्शनर्स मित्रमंडळ' स्थापन केले असून मित्रमंडळानी गेल्या वर्षी विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. नुकतेच मंडळाने १९ एप्रिल २०१५ ला 'वासंतिक हळदीकुंकू समारंभ आणि सुगम संगीत' कार्यक्रम आयोजित केला होता. मित्रमंडळाचे १०० सभासद झालेले आहेत. मंडळाचे कार्यवाह श्री. सतीश शेट्टी व इतर सभासद यांचे असोसिएशन तर्फे अभिनंदन.

सेक्रेटरी

* ****** *

**बोरीवली युनिट -**

बोरीवली, मुंबई युनिट तर्फे नुकताच आपल्या बँकेतील निवृत्त अधिकारी, सुप्रसिद्ध गायक श्री. जयवंत पोवळे यांचा 'सुगम संगीताचे मर्म'हा सुमारे दीड तासाचा सुंदर कार्यक्रम झाला त्याला उपस्थित सर्व रसिक सभासदांनी भरभरून वाहवा दिली. श्री. पोवळे हे फक्त ७८ वर्षांचे असून त्यांचा गेली ६० वर्षांचा सुगमसंगीताचा अभ्यास आहे. श्री. पोवळे यांनी गजानन वाटवे व सुधीर फडके यांची प्रसिद्ध भावगीते त्यांच्या खुबीसह सादर केली. तसेच त्यांनी सांगितलेल्या आठवणी कुठेही वाचलेल्या / ऐकलेल्या नव्हत्या त्यामुळे सर्व श्रोतृवर्गाने शेवटी उभे राहून मानवंदना दिली.

श्री. पोवळे यांना तबल्याची साथ आपलेच निवृत्त सभासद श्री. शिवडेकर यांनी समर्थपणे केली.

**सचिव**

* ****** *

**NANDED-HINGOLI UNIT Report For 2014.15:**

We hold the monthly meeting of the pensioners'invariably on 1st Sunday of every monthin the premises of APMC (Nanded) branch of SBI.On an average 25/30 members attend the meeting.During the meeting new pensioners are being welcomed by offering a bouquet. We also wish the pensioners happy, healthy and long life whose birth dayis falling during that month.

Shri Salve S.L.,Secretary, who is very active, has been maintaining an up to date record of all the pensioners. Further the problems of the members are also followed up with the RBO / branches till they are solved. Our unit is extending full co-operation to the RBO & concerned branch staff in order to solve the problems.

**DISPENSARY:** The doctor nominated by the Bank is visiting thrice in a week i.e. on Tuesday, Thursday & Saturday as against two days in the past.Further the matter of providing medicines was taken up with the Zonal Office and the sanction thereto has since been received. The proposal of Radiologist/Pathologist has also been submitted to Z.O.

**(ii)Smt. SushilabaiSonkamble :** The proposal for payment of lumpsum amount (Rs 4 lacs)to the widow of the deceased, was turned down twice by the Bank.The same was resubmitted, followed upand there after sanction was accorded.

**iii)Smt. Snehal D. Giri :**The pension was stopped by the Bank erroneously and an amount of Rs. 1,25,000/- was shown as recoverable, being paid in excess.However, the unit made persistent follow up with the PPG Deptt. for wrong presumption and at last the family pensioner got arrears of Rs.84,600/- .

**Smt. Pushpabai G. Kandhare:**As per the circular instructions the family pensioner is eligible to get both the pensions i.e. from the Bank and DefenceDeptt. Accordingly, all the past records of the pensioners were traced by the unit and the proposal has since been submitted for sanction.

**Membership of the unit. :**Our unit is very keen to enroll new members through follow up. We have enrolled all

the pensioners retired during 2014-15.Due to our visits to Parbhaniand LaturDistrictsour members there from, have established units thereat and both the units are conducting monthly meetings regularly.

**Arrears of Encashment of Leave :**

In respect of the 17 pensioners retired from RBO (III),Beed,due to the follow up through Zonal Secretary,the difference of leave encashment for broken period was sanctioned to these members.

**Donation For "Samvad":** In response to the appeal made by our Association, SarvashriK.S. Kamble, President, S.L. Salve, Secretary, and S.R. Kanchalwar,Treasurer were instrumental in collecting donations for "Samvad" to the tune of Rs. 56,600/-

During the year 2014-15 our unit paid homage toall our deceased members.

We are always guided by our senior leader Shri M. T. Deshpande, Vice President, Aurangabad ZSC. We are getting active support from staff at RBO and Branches as well as from Aurangabad Zonal Sub Centre.

**S.L.Salve, Secretary**

* ****** *

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असो. वसई-विरार सभेची सूचना

गुरुवार दि. १५ ऑक्टोबर २०१५ रोजी दुपारी ३.४५ वाजता वसई व विरार या भागातील स्टेट बँकेच्या सर्व निवृत्त कर्मचाऱ्यांची एक सभा, आपल्या असोसिएशनचा वसई - विरार विभाग व नवघर आणि पारनाका (वसई) या स्टेट बँकेच्या शाखांच्या संयुक्त विद्यमाने बँकेच्या वसई (बसीन) पारनाका शाखेत आयोजित केली आहे.

या सभेस मा.श्री. अश्रफ अली बेग, उपमहाप्रबंधक, मुंबई ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफीस झोन क्रमांक (IV), मा. श्री. अभय केळकर, सहाय्यक महाप्रबंधक रिजनल बिझिनेस ऑफीस (II), श्री. सदाशिव गोखले, अध्यक्ष, एस. बी. आय. पेन्शनर्स असोसिएशन मुंबई सर्कल व श्री. बाळासाहेब दांडेकर, पेन्शनर्स असोसिएशनचे सल्लागार हे उपस्थित राहणार आहेत. वसई व विरार या भागात राहणाऱ्या पेन्शनर्सनी या सभेस आवर्जुन उपस्थित रहावे ही विनंती.

पी. ए. लोपीस
रिजनल सेक्रेटरी
मुंबई झोनल
सब सेंटर

**Minutes of Bank's Pensioners' Meetof Pune Zone held at Kolhapur on 24th June 2015**

1) The meet of the pensioners' of Pune Zone I & II was arranged at Indraprastha Hall Kolhapur on 24$^{th}$ June 2015.S/ Shri RaghuramShetty, DGM, B O 1, Shantanu Pendase,AGM, RBO, Kolhapur, Office bearers of Pensioners Association Mumbai Circle and Pune Zonal Sub Centre and around 300 pensioner memberswere present. The Bank,sdignitaries were welcomed by Shri Chandrakant Kulkarni,Pressident, SBI Pensioners' Assn., Pune Zonal Sub Centre.

2) Shri Vaidya, Manager,(HR),RBO, Kolhapur, thanked the Pensioners' Assn. for making good arrangements for the Pensioners' Meet and stated that every effort is made by the bank to give good service to the pensioners. Shri Shantanu PendaseAGM, RBO, Kolhapur,expressed happiness and gratitude in meeting the Bank's Pensioners who have created the big and a strong Banking institute like SBI. He saluted the guidance he receives from the elders and stated that he gives priority for solving the issues of pensioners.

3) Shri S. S. Deshpande, President,SataraUnit, pointed out that the RBO Office Satara is saying that V R S and Exit optees and serving spouse of the pensioners'will not get medicines at dispensary. He also raised issue of long pendency of medical bills under MWS and SBIRMB Schemes.Shri Tamhankar from Sangli Unit, stated thata proposal for dispensary at Sangli was submitted more than two years back and still it is pending. Zonal Office Official informed that it is sent to LHO, but it transpired that was not submitted to LHO. On this point Shri Vaidya told that he would expedite all the proposals. On this reply, Shri Gandhe Secretary,Mumbai Circle,asked reasons forthe pendency of two years and the follow up done in this period. There was no answer from him.

4) Shri Ashok Pandit, Joint Secretary, Pune ZSC, pointed that the proposal for dispensary at HinganeKhurd is also pending for more than three years. He pointed out that big number of working staff as well as pensioners are staying in Sinhagad Road Hingane,Wadgaonand Warje area.The dispensary is needed for them considering the serving staff strength of the branches in this area.

5) Shri Chandrakant Kulkarni, President, Pune ZSC, appreciated the co-operation that is received from Zonal Office in solving the issues. He stated that for Kolhapur dispensary the Circle representatives followed up at LHO last week who told that the proposal is not yet received at LHO. He also stated that this is the third

AGM, since 2013 and the proposal for Hingane (Khurda) dispensary is still pending at Zonal Office and needs introspection and concern on the part of all concerned. He said that there is move to shift the dispensaries at D. G. Pune and Paud Road which have been efficiently functioning,to other locations. This will deprive many serving employees and pensioners of medical facilities and there is a strong resistance for this move from the pensioner members. He further added that the size of Pune city is five to six times bigger than a normal city, and there are number of establishments and large number of branches therein, thousands of working staff, their family members and pensioners are staying therein, which necessitates the need for more dispensaries in Pune city and suburbs like Hadapsar, Pimpri-Chincwad,Katraj etc. These aspects must be considered while dealing with any proposal about dispensary, he added.

6) Shri Raghuram Shetty expressed his pleasure in meeting the big gathering of seniors and expressed that due to the good work done by them, bank is seeing good days. He stated that due to acute staff position, payment of few bills were delayed andthe position is normalised now. He also confirmed that pensioners under VRS, Exit and their spousesare no bar for dispensary facilities to pensioners and added that he wouldinstruct the concerned staff members in this regard. About the pending proposals of dispensaries he assured to solve the issue immediately.

7) After vote of thanks by Shri V. N. Kulkarni Vice President Pune ZSC, the Bank's Pensioners' Meet was concluded.

- Secretary

* * * * * *

## वाचकांची प्रतिक्रिया

'संवाद' ने आयोजित केलेल्या लेखस्पर्धांचे निकाल अत्यंत नि:पक्षपातीपणे लावल्याचे दिसते. ही गोष्ट संपादक मंडळास भूषणास्पद व अभिनंदन करण्यासारखीच आहे. कोणताही पक्षपात न करता लेखातील गुणवत्तेवरच निकाल आधारीत होता हे स्पर्धेतील बक्षीसपात्र प्रसिद्ध झालेल्या लेखांवरून दिसते. यासाठी 'संवाद'च्या परीक्षकांचे अभिनंदन.

**प्रकाश विनायक कुलकर्णी**

## Portal on Technology Initiative for Disabled and Elderly

Old Age Solutions is a portal on Technology Initiative, by Ministry of Science and Technology (Government of India), and brought for the disabled and elderly people by All India Institute of Medical Sciences New Delhi. The website address is **www.oldagesolutions.org**. **The information is available in Marathi, Hindi, Tamil, Bengali and Telugu languages.**The special feature of this portal is that the old age people can avail of the facilities like Recreation and Entertainment, Health, Assistive Devices, Design and Environment and Facilities. Under Recreation and Entertainment you can play online with puzzles, Sudoku etc. just to kill your time. Inaddition to this, information/guidance is also available on Exercises, Yoga, Kitchen Garden etc. Under the category of health it has been advised how to take care of your physical and mental health, what should be your diet etc. The elders can also give their opinion on anysubject. The portal has taken in to account all the basic needs of the elderly as well as disabled persons.Since the portal has provided the information in regional languages as mentioned above, all the pensioners are requested to take advantage of this portal.

**Vilas Gandhe, Secretary**

******************

For information of SBI Pensioners, we are publishing hereunder the relevant provisions of Sec 50(o) (2), of SBI ACT 1955, according to which the SBI need to consult RBI and get approval of Central Government for giving any benefit to Pensioners, although the Pension is computed as per SBI Pension RegulationNo.23(Sub Regulation No.1,2&3)

***- Secretary***

*********************************************************************************************

## The State Bank of India Act 1955 (23 of 1955)

**<u>Section 50 : Power of Central Board to make regulations</u> :-**

(1) The Central Board may,after consultation with the Reserve Bank and with the previous sanction of the CentralGovernment [by notification in the official Gazette], make regulations, not inconsistent withthis Act and the rules made thereunder, to provide for all matters for which provision isexpedient for the purpose of giving effect to the provisions of this Act.

(2) In particular, and without prejudice to the generality of the foregoing power, suchregulations may provide for -

(O) the establishment and maintenance of superannuation, pension, provident orother funds for the benefit of the employees of the State Bank or of the dependentsof such employees or for the purposes of the State Bank, and the granting ofsuperannuation allowances, annuities and pensions payable out of any such fund;

(2A) All regulations made under this section shall have effect from such earlier or later date may be as specified in the regulations.)


## Opportunity for Retired Bankers

insta Remedy
Zindagi Banaaye Aasaan

**Insta Remedy**is an E commerce platform that deals with post purchase consumer grievances across India. It has been founded by corporate professionals and industrialists. We have on board an experienced top management team that have served institutions like RBI and SBI. The team comprises of expert professionals spanning across Banking, Insurance, Telecom, Lifestyle etc. who provide the required knowledge base in addressing the grievances. We are also privileged to have on board an ex DMD of SBI and ex-Chairman of LIC as Independent directors.
While we are primarily an online E-commerce company, however we go beyond online and service the customer by providing end-to-end support. To meet this requirement, we are looking for retired bankers who will be positioned as a facilitator and partner to represent InstaRemedy in giving a last mile support to the customer. The role will involve coordination and Onsite Support to customers in their own town including local lingual support, wherever required.
There is no marketing/ investment involved but the experience of the person is what matters in facilitating resolution of such complaints.The model envisages working from home and providing onsite support. There is an attractive remuneration apart from incentives like foreign trips etc. So what are you waiting for… all the retired bankers who want to lead an active life and serve society and in the process earn money, join Insta Remedy now and be our Resolution Partners.
**Ashutosh Sharma,**Chief Business Development Officer
**Mob**– 9888328204/ **Landline** – 022 2831 4662/ 02228324664
**Email -** ashutosh.sharma@instaremedy.com
***Website***: *<u>www.instaremedy.com</u>. (Currently under construction)*

## म्युच्युअल वेलफेअर स्किम (MWS)

सभासदांच्या माहितीसाठी आम्ही वरील योजनेअंतर्गत वैद्यकीय चिकित्सेसाठी झालेल्या खर्चाचा परतावा मिळण्यासाठीचा अर्ज देत आहोत. या अर्जात कृपया पेन्शन खात्याचा नंबर व दूर अथवा भ्रमणध्वनी नंबर लिहिणे.

ऑगस्ट २०१५ च्या 'संवाद'मध्ये माहिती दिल्याप्रमाणे, फॅमिली पेन्शनसाठीच्या अर्जासोबत आधार कार्ड/पॅनकार्डची प्रत पण जोडणे आवश्यक आहे.

सेक्रेटरी

---

# पारस्पारिक कल्याण योजना के अंतर्गत चिकित्सा व्यय बिल की प्रतिपूर्ती

१. निवृत्त कर्मचारी का पुरा नाम :
तथा पी.एफ.क्रमांक : ____________________

२. निवृत्त होने की तारीख तथा ____________________
आखरी पद : ____________________

३. संपर्क के लिए पत्ता : ____________________
____________________
____________________

४. युनिट : (रु. २०/४०/६०/८० जो ____________________
१.१२.१९८२ के बाद निवृत्त हुए)

५. क्या अपने सभासदत्व का अभी तक: हाँ/नहीं.
पुरा चन्दा दिया है

६. बिमारी का स्वरूप तथा अवधि : (निम्नवत विवरण के साथ)

| नाम | आयू | तिथी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

७. इलाज का विवरण और डॉक्टर के नाम और पत्ता : ____________________
____________________
____________________

अस्पताल के नाम और पत्ता (यदि अस्पताल में भरती हो तो) ____________________
____________________
____________________

औषध विक्रेता का नाम और बिल क्रमांक और दिनांक ____________________

(व्यय का विवरण, नुक्खा प्रिस्क्रिप्शन संबंधित बिल संलग्न करें)

मैं प्रमाणित करता हूँ कि उपरोक्त व्यय मैने अपने लिए/पत्नी/पती के लिये खर्च किया है. मैं साथ में यह भी प्रमाणित करना चाहता हूँ कि उपरोक्त व्यय के दावे के लिए किसी व्यक्तीगत पॉलिसी या दुर्घटना के संबंधमें किसी दावे या किसी स्त्रोत/साधन के अंतर्गत मुझे राशी की न तो पुरी आंशिक प्रतिपुर्ती की गयी हैं और ना ही मैं उसके लिए पात्र हूँ.

मै और भी प्रमाणित करना चाहता हूँ की

१. मैं तथा मेरी पत्नी/पती निवृत्त होने के बाद कोई भी नौकरी नहीं कर रहें हैं अथवा

२. किसी संगठन / संस्था से मुझे कोई भी चिकित्सा बिल की प्रतिपुर्ती नहीं मिलती है (अगर आप नौकरी कर रहें है तो)

दिनांक : निवृत्त कर्मचारी के हस्ताक्षर

मैने सभी बिलों की शिनाख्त / छानबिन की है और सभी बिल सही है, मैं सभी बिल मंजुरी के लिए सिफारिश कर रहा हूँ

दिनांक शाखा प्रबंधक, शाखा

---

## आंचलिक कार्यालय के लिए

बिल दावे की रक्कम ____________________

बिल मंजुर की गयी रक्कम ____________________

(रु.____________________ सिर्फ )

---

| प्रतिनिधी (कर्मचारी युनियन) | प्रतिनिधी (अधिकारी वर्ग युनियन) | मुख्य प्रबंधक (कार्मिक) |
|---|---|---|

धनादेश क्रमांक दिनांक रु.

(रुपये ____________________ सिर्फ )

# 'संवाद' लेखस्पर्धा २०१५
# द्वितीय पारितोषिक विजेता लेख
# पुरुष विभाग

## आयुष्यात राहून गेलेली गोष्ट (मनोगत)

''प्रेम करायचे राहून गेले भाई!'' आम्ही ताडदेवला चाळीत राहात होतो. आई-वडील, मी व माझा थोरला भाऊ. वडिलांना आम्ही अण्णा म्हणायचो. भावाला मी भाई म्हणत असे. भाई माझ्यापेक्षा १४ वर्षांनी मोठा. आमची चार मजली चाळ. एकूण ८० बिऱ्हाडे. चाळीत मुला-मुलींची रेलचेल. प्रत्येक खोलीत एक छुपं प्रेम प्रकरण. हे असं वातावरण अभ्यासाला पोषक असतं तरचं नवल. भाई अभ्यासात खूप कच्चा होता. त्यात त्याला खोड्या काढण्याची खुमखुमी. त्यामानाने मी अभ्यासात उजवा. भाईची अभ्यासातील अधोगती, त्यात त्याला कुरापती काढण्याची सवय असल्यामुळे शेजारी-पाजारी त्याच्याबद्दल दररोज तक्रारी करायचे. अण्णांना भाईच्या वागण्याचा कंटाळा आला होता. हा आपला मुलगा सुखाने जगू देणार नाही असं त्यांना वाटू लागलं. त्याच्या अभ्यासाबद्दलच्या त्यांच्या आशा पार मावळल्या. दिवसेंदिवस अण्णांचं भाईबरोबरचं वागणं बदलू लागलं. ते त्याला घालून पाडून बोलू लागले. कधी कधी सर्वांच्या पुढ्यात. आण्णा शीघ्रकोपी झाले. पटकन् चिडू लागले. आईचं अण्णांपुढे काहीच चालत नसे. नवरा करील ते प्रमाण या पारंपरिक विचारांची आई, मुलाच्या ममतेपोटी आण्णांचं वागणं मुकाटपणे सहन करीत होती. अण्णांनी भाईच्या वर्तनाचा शांतपणे, संयमाने, समतोल बुद्धीने विचार केला असता आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवून ही परिस्थिती हाताळली असती तर चित्र कदाचित वेगळं दिसलं असतं. त्यावेळेस मी लहान होतो, अण्णांच्या स्वभावाचं मूल्यमापन किंवा विश्लेषण करण्यांचं ते माझं वयच नव्हतं. (आज मागे वळून पाहताना या सगळ्या गोष्टींचं आकलन होतंय.) पण ते काही झालं नाही. एकीकडे अण्णांकडून भाईला बोलणी खावी लागत होती आणि दुसरीकडे माझे लाड होत होते. त्यात मी वयाने लहान असल्यामुळे अण्णांकडून मला झुकतं माप मिळतं होतं. कदाचित मी चांगलं शिकून नावारूपाला यावं या एकमेव आशेनं ते माझ्याकडे पाहात होते. १९६२ साली मला टायफॉईड झाला होता तेव्हा तीन महिने रात्र रात्र जागून त्यांनी माझी सेवा केली. तो माझा पुनर्जन्मच होता असं म्हणायला हवं. मात्र अण्णांच्या या स्वभावातल्या परिस्थितिजन्य विसंगतीमुळे भाईच्या मानसिकतेत अनेक न्यूनगंडांचा कोलाहल माजू लागला. त्याचं मानसिक खच्चीकरण होऊ लागलं. त्याचं व्यक्तिमत्त्व खुरटलं. या पार्श्वभूमीवर मी मला भाईच्या तुलनेत थोडा जास्तच हुशार समजू लागलो. आम्हा दोघांच्या वयातलं मोठं अंतर, शैक्षणिक प्रगतीमधला डावे-उजवे पणा, अण्णांचा भाईबद्दलचा पूर्ण नकारात्मक दृष्टीकोन आणि माझं कोडकौतुक याचा एकत्रित परिणाम म्हणून की काय आम्हा दोन भावात सुसंवाद तर राहोच साधा संवाद ही होईना. सख्खे भाऊ म्हणून एकमेकांना समजून घेईनासे झालो. याची परिणती अशी झाली की भाईच्या मनात नकळत माझ्याबद्दल आकसाचं बीज पेरलं गेलं. आपल्या जन्मदात्या बापाच्या वागणुकीने आलेल्या मानसिक दडपणामुळे त्याची विचारशक्ती क्षीण झाली. मोठा भाऊ या नात्याने मला समजून घेण्याच्या मनस्थितीपलिकडे तो गेला होता. माझ्याकडूनही त्याला प्रेम मिळेनासं झालं. सख्खे भाऊ म्हणून आम्ही एकमेकांशी प्रेमाने कधी बोलल्याचं मला स्मरत नाही. भाई आपल्या समवयस्क मित्रांबरोबर वेळ दवडीत होता. मी माझ्या सवंगड्यांबरोबर माझं बालपण व्यतीत करत होतो.

मी १६ वर्षांचा असताना भाईला गावाहून एक पत्र पाठवलं होतं. ''तुझ्या स्वभावामुळे तुझ्यावरचं माझं प्रेम मी व्यक्त करू शकत नाही.'' असं एक वाक्य मी त्या पत्रात लिहिलं होतं. पत्राचं उत्तर आलं नाही. कसला प्रतिसादही मिळाला नाही. वास्तव हे होतं की आमच्यात भावनिक दरी निर्माण झाली होती. आम्ही एकमेकांपासून दुरावलो होतो.

वयाच्या ३१व्या वर्षी अण्णांच्या ओळखीने भाईला नोकरी लागली. त्यानंतर अण्णांनी त्याचं लग्न करून दिलं. एका घरंदाज कुटुंबातली मुलगी त्याची पत्नी म्हणून आमच्या घरात आली. भाईला त्याच्या कलाने समजून घेणारं आपलं माणूस मिळालं. वहिनीने सर्व गुणदोषांसकट त्याला मनापासून स्वीकारलं. भाईला आयुष्याचा अर्थ गवसला. जीवनाचं प्रयोजन मिळालं. त्याची मानसिकता बदलली. तो समाजात सपत्निक वावरू लागला. दरम्यान त्याला वाचनाची आवड निर्माण झाली. पुस्तकं विकत घेऊन तो वाचू लागला. पुस्तकातली चांगली वाक्यं, सुविचार आपल्या डायरीत लिहून ठेवू लागला. त्याच्या भावजाणीवा हळूहळू विस्तारू लागल्या.

सहा वर्षांनी अण्णांचं हृदयविकाराच्या झटक्यानं दुःखद निधन झालं. त्यानंतर दोन वर्षांनी माझं लग्न झालं. एका खोलीत दोन जोडप्यांचा संसार सुरू झाला. काही महिन्यातच जावा-जावांची धुसफूस सुरू झाली. अबोल्याचं पर्यवसान भांडणात होण्यापूर्वीच आम्ही उभयतांनी चांगलेपणी वेगळं व्हायचा निर्णय घेतला. घर सोडताना भाई म्हणाला, ''माझ्या घराचे दरवाजे तुमच्यासाठी सदैव उघडे आहेत.'' एकमेकास मिठी मारून आम्ही अश्रुपूर्ण नयनांनी निरोप घेतला. त्यावेळेस भाईमधल्या सूप्त बांधुप्रेमाची अंधुकशी जाणीव मला झाली. परंतु एक गोष्ट मात्र झाली की ज्या वयात हे बंधुप्रेम दृढ व्हायला हवं होतं ते वय आणि वेळही निघून गेली होती. आम्ही आता देहानेही एकमेकांपासून दूर झालो होतो. तसे एकमेकांकडे जात येत होतो पण त्यात प्रेमबंध नव्हता. मी माझ्या संसारात व्यस्त आणि तो त्याच्या.

एक दिवस माझ्या पत्नीने माझ्यापुढे एक प्रस्ताव मांडला. ''या डिसेंबर मध्ये मनोहर भावोजींचा ५१ वा वाढदिवस आहे. तो आपल्या घरी साजरा करू या.'' मी ती कल्पना उचलून धरली. भाईचा जन्मदिवस दत्तजयंतीचा. आम्ही दिवस मुक्रर केला. भाईला व वहिनींना घरी येण्याचं आमंत्रण दिलं. त्यांना प्रयोजनाचा कसलाच सुगावा लागू दिला नाही. एक छोटं 'गेट-टुगेदर' आहे असं सांगून निकटच्या काही नातेवाईकांना आमंत्रित केलं. ठरल्या दिवशी सगळी मंडळी आली. सोहळ्याचं निमित्त लक्षात येताच सर्वांना खूप आनंद झाला. सर्वांनी भाईचं अभीष्टचिंतन केलं. वाढदिवस उत्साहात व आनंदात साजरा झाला. भाईचा चेहरा समाधानाने फुलून गेला होता. स्वत:चा कौतुक समारंभ पाह्यला त्याला ५० वर्ष वाट पाहावी लागली. वहिनी देखील खूष होती. उभयता आमच्या घरी चार दिवस मजेत राहिली. तृप्त होऊन आपल्या घरी गेली. मलाही खूप बरं वाटलं. यापुढे तरी आमचे हे भावबंध घट्ट होतील या आशेचा कवडसा मनात उमटला. उशीरा का होईना मी भाईवर नव्याने प्रेमाचा वर्षाव करणार होतो. बंधुप्रेमाचा नवीन अध्याय सुरू होणार होता. या नवीन अनुभूतीच्या नुसत्या चाहुलीनेच मी मनातून सुखावलो होतो.

पण हाय रे दैवा! बरोबर दोन महिन्यानी म्हणजे २७ फेब्रुवारी १९८२ला मेंदूतील रक्तस्त्रावाने भाईचं आकस्मिक निधन झालं. हे असं अघटित घडेल याची कुणालाच कल्पना नव्हती. वहिनीसकट आम्हा सर्वांनाच दु:ख अनावर झालं होतं. इतक्या अकस्मातपणे हे असं कसं झालं? आयुष्यात प्रथमच अनुभवलेले अत्युच्च आनंदाचे क्षण आणि स्वत:च्या कौतुकाची सुखद जाणीव त्याच्या सहनशक्तीपलिकडे गेली का? या प्रश्नाचं उत्तर भाई आपल्या बरोबर घेऊन गेला. मात्र मनात खोलवर रुतलेली एक मर्मांतक व्यथा माझ्यासाठी ठेवून गेला. अगदी पहिल्यापासून शेवटपर्यंत बंधुप्रेम माझ्या प्राक्तनातच नव्हतं. सख्खे भाऊ असूनही एकमेकांवर प्रेम करू शकलो नाही ही नियतीने आमच्यासाठी धाडलेली एक दुर्दैवी विसंगती होती. भाईसर प्रेम करायचं राहून गेलं ते गेलंच. अगदी अखेरपर्यंत.

**मोतीराम द्वा. बिडये**, अंधेरी (प.) , **मोबा. : ९८१९९२६९८४**

# द्वितीय पारितोषिक विजेता लेख
# स्त्री विभाग

## जीवनातील सर्वोच्च ध्येय

आपला देश पारतंत्र्याच्या काळात यमयातना भोगीत होता, तेव्हा अनेकांना स्वातंत्र्याचा ध्यास लागून राहिला होता. त्यासाठी म. गांधी, लो. टिळक, बॅ. सावरकर यांसारखे हजारो नेते रात्रंदिवस झपाटून कार्य करीत होते. त्यांना तहान-भुकेचीही तमा नव्हती. परदेशी मालाच्या होळ्या पेटवून साऱ्यांनी परदेशी मालावर बहिष्कार टाकला. स्वदेशीच्या हट्टासाठी बाबू गेनूसारखा निधड्या छातीचा वीर निर्भयपणे ट्रकसमोर आडवा पडला. इंग्रज अधिकाऱ्याच्या इशाऱ्यावरून पाषाणहृदयी ड्रायव्हरने धडाडत ट्रक बाबू गेनूच्या अंगावरून पुढे नेला. त्यासरशी त्याच्या अंगातून कारंज्याप्रमाणे रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. रक्तमांसाचा चिखल झाला. त्याचबरोबर त्याच्या हातातील तिरंगी ध्वजानेही मातृभूमीला आलिंगन दिले. राजगुरू, चाफेकर, सुखदेव यांनी तर फाशीच्या दोराला पुष्पहारासम आनंदाने गळा माळून घेतले. तोंडाने 'वंदे मातरम्'चा जप चालूच होता. असे कितीतरी वेडेपीर स्वातंत्र्यासाठी शहीद झाले. केवढे हे देशप्रेम!

स्वातंत्र्यासाठी साऱ्यांनीच शीर तळहातावर घेतले होते. 'भारत छोडो,' 'चले जाव'चा धोशाच गांधीजींनी इंग्रजांमागे लावला होता. देशस्वातंत्र्याचे वारे त्यांच्या नसानसात भिनले होते. त्यासाठी हवी ती किंमतही ते मोजीत होते. सत्य, अहिंसेच्या लढ्याने ते गोऱ्यांशी टक्कर देत राहिले.

मेरी झाँसी नहीं दूँगी म्हणणारी राणी लक्ष्मीबाई झाशी वाचविण्याच्या ध्येयाने पछाडली होती. 'इंग्रजांचा झाशीला पडला होता वेढा, फेकला तिने तटावरूनी घोडा.' केवढे हे धैर्य! इंग्रजांच्या तावडीत सापडताच प्राणांची बाजी लावून ती प्राणपणाने लढली. तिचे अतुलनीय शौर्य पाहून शत्रूनेही उद्गार काढले, 'खूब लडी मर्दानी!'

तिच्याविषयीचे हे उद्गार आजही आपली छाती अभिमानाने फुलवितात.

पारतंत्र्याच्या काळात वरील सर्वच वीर-वीरांगनांचे 'देशस्वातंत्र्य' हेच जीवनातील सर्वोच्च ध्येय होते.

कळत न कळत प्रत्येकाच्याच जीवनात काही ना काही ध्येय असतेच. स्पर्धा, स्वत:चे समाजातील स्थान, जीवनप्रवासात आलेली संकटे, वैयक्तिक प्रेरणा या ना त्या कारणाने ध्येये हे माणसाच्या आयुष्यात प्रवेश करते. म्हणच आहे, ध्येयहीन माणूस सुकाणू नसलेल्या नावेसारखा असतो. सुकाणू नसलेली नाव जशी अयोग्य दिशेला भरकटून दिशेऐवजी दशा करून घेते, तद्वतच माणसाचेही होते. नेमके ध्येय डोळ्यासमोर असले तर माणूस त्याचाच पाठपुरावा करतो. अन्यथा जगायचे म्हणून जगत राहातो. ध्येयच नसतं तर जगणं मरणं सारखंच ठरलं असतं. मृतवत जिणे म्हणजे जिवंतपणीचे मरणेच नव्हे काय?

माझ्या लहानपणी घडलेला प्रसंग. एकदा मी मुंबईहून गावी आलेल्या मोठ्या भावाच्या खिशातील अधेली कुतुहलापोटी चोरली. कारण तेव्हा आजच्यासारखे सर्रास पैसे हाताळायला कधीच मिळत नसत. चवली, पावली, अधेली, रुपया ही त्या काळातील प्रचलित नाणी होती. कोणाच्या खिशातही पैशांचा फार खुळखुळाट नव्हता. मोजकेच पैसे असल्याने ज्याच्या खिशात असत, त्यालाही ते अचूक ठाऊक असत. त्यामुळेच माझ्या भावाच्या खिशातील गायब झालेली

अधेली यथावकाश त्याच्याही लक्षात आलीच. त्याला वाईटही वाटले आणि रागही आला. त्याने माझ्यासह सर्वांनाच अधेलीविषयी विचारले. अगदी खडसावून विचारले. मी सोडून इतरांनी ती घेतली नसल्याने नाही असेच उत्तर दिले. माझी तर पार पाचावर धारण बसली. भावाच्या हे लक्षात येईल याची सुतराम कल्पना मला नव्हती. तरीही मी सुद्धा अधेली घेतली नाही असे बळेच अवसान आणून सांगितले. पण भावाचा रुद्रावतार पाहून घाबरगुंडी उडाली. कशी का होईना पण ती अधेली परत जशीच्या तशी दादाच्या खिशात टाकून द्यायची ठरविले. पण तेवढेही धैर्य होईना. लहानपणी संकटकाळी प्रत्येकालाच प्रथम आईची आठवण येते, तशीच मलाही आता आली. मदतही तिचीच झाली. ''आई, दादाची अधेली मी चोरली आहे, पण हे दादाला सांगू नकोस. मी ती तुझ्याकडे देते आणि तूच त्याच्या खिशात ठेव.'' अशी तिला विनवणी केली. गुन्हा कबूल केल्याचा आईलाही आतून आनंद झालाच. तिनेही माझ्या अटी मान्य करून ती अधेली गुपचूप दादाच्या खिशात टाकली. त्याक्षणी मला किती हायसे वाटले म्हणून सांगू! भावाच्या हिशेबी वृत्तीमुळे मी अप्रत्यक्षपणे का होईना पण 'चोर' म्हणून सिद्ध झाले होते. त्या बालवयात सुद्धा ती गोष्ट मनाला कित्येक दिवस छळत राहिली. यापुढे कधीच कोणतीच चोरी करायची नाही असा मनाने ठाम निर्णय घेतला. त्या निर्णयाचेच पुढे चोरी न करण्याच्या ध्येयात रुपांतर होऊन गेले.

वरील प्रसंग आईजवळ तरी खरा सांगण्याचा धीर मला झाला. त्याचे परिवर्तन नेहमीच खरे बोलण्यात कधी होऊन गेले ते कळलेच नाही. स्वत: तर नाहीच पण दुसराही खोटे बोललेला मला आता चालत नाही.

केवळ एका मामुली प्रसंगामुळे चोरी न करणे आणि नेहमी सत्य बोलणे ही माझ्या मते माझ्या जीवनातील सर्वोच्च ध्येये बनून गेली.

एकदा मोठ्या मुलींची इंजिनियरिंगची फी भरण्याची वेळ आली. यजमान तेव्हा नोकरीनिमित्त परगावी होते. संकटावर मात तर मलाच करायची होती. माझ्याजवळ तर इतके पैसेच नव्हते. माझे डोळे पांढरे व्हायची वेळ तेवढी बाकी राहिली होती. डोके सुन्न झाले. आता मात्र मला माझ्या मोठ्या भावाचीच प्रकर्षाने आठवण झाली. काही वेळापुरता तरी जीव भांड्यात पडला. पण त्या आधी मी मनसोक्त रडून घेतले. हातात पैसा नसल्यावर मनाची काय अवस्था होऊ शकते ते मी याचि देहि याचि डोळा अनुभवले. बस्स, त्याच क्षणी मनाने निर्णय घेतला. यापुढे पैशासाठी कधीच रडायचे नाही. पैशांसाठी हेच पहिले रडणे नि अखेरचे रडणे. तेव्हापासून पैशाला पैसा जोडत राहिले. कोणालाही न फसविता प्रामाणिकपणे पैसा गोळा करत राहिले. त्याहीपेक्षा तो सांभाळण्याचे, जपण्याचे अवघड कार्यही करीत राहिले. त्यासाठी अनेक कष्ट करावे लागले, काटकसर करावी लागली, टिंगलटवाळी सहन करावी लागली. पण मी माझ्या निर्णयापासून तसूभरही हलले नाही. त्या क्षणापासून सत्याच्या वाटेने पैसा मिळविणे हेही आणखी एक ध्येय आपोआपच ठरून गेले.

ध्येयाने पछाडलेला माणूस कशाचीही तमा बाळगत नाही. द्रौपदी स्वयंवराच्या वेळी अर्जुनाला फक्त पाण्यातील पक्ष्याच्या फिरत्या प्रतिबिंबातील डोळाच दिसत होता. अर्जुनाने त्याचा अचूक वेध घेतला. स्वयंवरातील पण जिंकला. ध्येयाने प्रेरित होऊन सर्व शक्ती एकाग्रतेत रुपांतरित झाली, म्हणूनच अर्जुन यशस्वी ठरला. तेव्हा ध्येय हे आयुष्यात हवे ते मिळवून देते यात काय शंका! ध्येयवेडी माणसे लोकांना वेडी वाटतील इतकी ती ध्येयमग्न झालेली असतात. ज्याला जे हवे ते ध्येय त्याने ठरवावे. कठोर परिश्रमांची, त्यागाची जोड देत त्या ध्येयाचा पाठपुरावा करावा. मग यश हे तुमचेच असते. सकारात्मक विचार, आखलेले ध्येय माणसाला कोठून कोठे पोहचविते हे ज्याने त्याने अनुभवण्याची गोष्ट आहे. शिवाय भल्याभल्यांची आयुष्ये साक्षीला आहेतच.

सत्य व प्रामाणिकपणा ही माझ्या मते माझी सर्वोच्च ध्येये आहेत. सत्याने वागल्यास परमेश्वर प्राप्तीची अन्य साधने शोधावी लागत नाहीत. सत्य हाच ईश्वर आहे. म्हणूनच सत्यवचनी रामाचे आजही सारेजण गोडवे गातात. सत्याचरणाने कुणाला घाबरण्याची, तोंड लपविण्याची पाळी कधीच येत नाही. ताठ मानेने नि ताठ कण्याने माणूस आयुष्यभर आनंदाने जगतो. ध्येयातूनच आत्मविश्वासाची ताकद माणसाच्या मनात संचारते. आत्मविश्वासामुळे कोणतेही ध्येय सर्वोच्च ध्येय ठरू शकते.

अनिष्ट गोष्टीत वेळ दवडणे दुसऱ्यांची निंदा नालस्ती करणे, रिकामटेकडे राहून आयुष्याचा नाश करणे हे सारे टाळले पाहिजे. त्यासाठी जीवनात काहीतरी करण्याचे, मिळविण्याचे ध्येय प्रत्येकाने बाळगले पाहिजे. प्रतिकूलतेतही अनुकूलता शोधली पाहिजे. ध्येय हाच आयुष्यातील दीपस्तंभ ठरला पाहिजे.

**सौ. शकुंतला औटी, मुलुंड (पूर्व), फोन नं. ०२२-२१६३८०६२**

## तृतीय पारितोषिक विजेता लेख
## पुरुष विभाग
### आयुष्यात राहून गेलेली गोष्ट

मनुष्याला अनेक इच्छा असतात. प्रत्येकाची इच्छा त्याच्या स्वभावाप्रमाणे व आवडीनुसार असते. तसेच प्रत्येकाची बुद्धी, कौशल्य, क्षमता, धडपड, जिद्द व परिश्रम घेण्यात सातत्य ठेवण्याची वेगवेगळी कमीजास्त पातळी असते.

कोणाला संगीत शिकावेसे वाटते, कोणाला एखादे वाद्य शिकून त्यात प्रावीण्य मिळवायचे असते, एखाद्याला अभिनयाचे अंग असेल

तर नट नटी व्हायचे असते, कोणाला ज्योतिषी तर एखाद्याला क्रिकेटपटू, टेनिसपटू, बुद्धीबळपटू किंवा तत्सम क्षेत्रात उच्च दर्जाचा खेळाडू व्हायचे असते. हे कलेच्या बाबतीत होय.

साध्या शिक्षणाच्या बाबतीतही कोणाला डॉक्टर, इंजिनिअर, सी.ए., वकील, प्रोफेसर होऊन आपले जीवनमान उंचवायचे असते, जेणेकरून समृद्ध जीवन व समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी.

सध्या आपल्या जीवनात इतकी अनंत क्षेत्रे आहेत की त्याला Sky is limit अशी स्थिती आहे. वानगी दाखल माहिती क्षेत्र, पर्यटन, प्रसार माध्यम, अगदी राजकारणसुद्धा जिथे मनुष्य यशस्वी होऊ शकतो.

असे जरी असले तरी आपल्याला वाटले, किंवा आपली इच्छा आहे म्हणून आपण ते मिळवूच शकतो असे नाही. किंबहूना प्रत्येकाला man praposes, God disposes असाच अनुभव जीवनात येतो. पण परमेश्वर जबाबदार असतो असे म्हणण्यापेक्षा प्रामुख्याने दोन घटक महत्त्वाचे असतात. एक परिस्थितीची अनुकुलता व प्रयत्न!

जे काही व्हावेसे वाटते ते तरुणपणी वाटत असते. आपल्या घरची परिस्थिती, वातावरण जर पोषक असेल तर अर्धेकाम झाले. दुसरे म्हणजे त्यासाठी करावे लागणारे प्रयत्न फार महत्त्वाचे असतात. त्यासाठी आपल्या अंगी तद्नुकुल गुणांबरोबर योग्य दिशेने प्रयत्नांचे सातत्य आवश्यक असते. नाहीतर यश मिळत नाही.

अचुक यत्न करवेना। म्हणून केले ते रुजेना।
आपुला अवगुण जाणवेना। काही केल्या।।

असे दासबोधात वचन आहे. म्हणून अनेक इच्छा फलद्रूप होऊ शकत नाहीत. त्या स्वप्नवत राहतात,

आयुष्याच्या वाटचालीत प्रत्येकजण अनेक स्वप्न, सुप्त इच्छा बाळगून असतो. तो त्या उघड, व्यक्त करतोच असे नाही. आपल्याला लॉटरी लागावी म्हणून आपण लॉटरीचे तिकिट खरेदी करतो. मिळाली तर काय मजा येईल,अशी शेख महमदी योजनाही आखतो. एखादी खूप आवडलेली मुलगी किंवा मुलींच्या बाबतीत मुलगा, आपला जीवनसाथी व्हावा असेही तरुण असताना वाटते. पण आपल्या जुन्या पिढीत एकमेकांशी बोलणंही धाडसाचे होते. मग पुढची गोष्टच सोडा! एखाद्या खाष्ट वरिष्ठाला धडा शिकविण्याची संधी मिळावी असे वाटते पण तसे जमत नाही. एवढे कशाला, आपल्याला पाहिजे तेथे बदली मिळणेही फार अवघड काम होते. ही किंवा अशीच स्वप्ने मनात त्या त्या वेळी येतात. पण कालौघात ती विरूनही जातात.

अशा गोष्टी आपण हळूहळू विसरूनही जातो. पण एखादी गोष्ट मात्र कायम मनात टोचणी करीत राहते. तीच आयुष्यात राहून गेलेली गोष्ट अशी :

शिक्षणाच्या सुरूवातीपासूनच मला अभ्यासात चांगली गती व आवड होती. पण घरच्या परिस्थितीमुळे व खेडेगावात माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्यामुळे मोठ्या बहिणीच्या आधाराने मुंबईस गेलो व स्कॉलरशिप मिळाल्यामुळे जुन्या ११ वी SSC पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

१९५३ मध्ये SSC झाल्यावर कॉलेजचे शिक्षण घ्यावे अशी इच्छा होती. त्यासाठी नगरला कॉलेजमध्ये नाव दाखल केले. पण संपूर्ण फी भरू न शकल्याने कॉलेज सोडावे लागले. ग्रॅज्युएट पदवीधर व्हावे ते तेव्हा जमले नाही. जमले तर पुढे प्रयत्न करू असे ठरवून नोकरीच्या शोधास लागलो. पण नोकरी तरी काय सहजासहजी मिळत होती, असे थोडेच होते?

२/२।। वर्षे किरकोळ नोकऱ्या करण्यात अस्थिरतेची गेली. पुढे दैवयोगाने एका सहृदय अशा महात्म्यांचे मदतीने १९५५ साली स्टेट बँकेत नोकरी मिळाली व वर्धा येथे कॅशियर म्हणून प्रारंभ झाला. बँकेत बदली हा एक अविभाज्य भाग आहे. दीडएक वर्षांनंतर वर्ध्याहून आर्वी या तालुक्याच्या गावी बदली झाली. तेथे कॉलेज नव्हते. आर्वीस आठ वर्षे होतो पण तेथे कॉलेज सुरू झाले तेव्हा माझी बदली देहूरोड (पुणेजवळ) झाली. चिंचवडला राहून सकाळी ८।। चे लोकलने निघावे लागे तेव्हा पुण्यास कसबागणपती मंदिराजवळ डेक्कन कॉमर्स इंस्टिट्यूटमध्ये प्रयत्न करून पाहिला पण चिंचवड, देहूरोड व पुणे हा प्रवास वेळही मिळणे शक्य नव्हते म्हणून तो प्रयत्न विफल ठरला. देहूरोडहूनही दीड दोन वर्षांत बारामती येथे झाली. मात्र बारामती येथे कॉलेज सकाळचे होते. तेव्हा ही संधी साधण्याचे ठरविले. तुळजाराम चतुरचंद कॉलेजामध्ये तेव्हाच्या प्री डिग्री आर्टस्‌मध्ये प्रवेश घेतला. एस.एस.सी. झाल्यावर १४ वर्षांनी कॉलेजविद्यार्थी झालो. गंमत अशी की, बरेच प्राध्यापक माझ्या वयाचे होते. सकाळी ७ ते १०।। कॉलेज व नंतर तसेच बँकेत जावे लागे. परिक्षेसाठी अगदी किरकोळ रजासुद्धा मिळाली नाही. पण पेपर संपल्यावर कामावर येण्याची परवानगी मिळाली. पूर्ण वर्ष व्यवस्थित पार पडले. कॉलेजमध्ये पहिल्या पाच क्रमांकात आलो! पण हे कॉलेजचे पहिले व शेवटचे वर्ष ठरले.

१९६९ साली डेप्युटी हेड कॅशिअर म्हणून डेक्कन जिमखाना येथे बदली झाली पण ती केवळ चार महिन्यांसाठी. कारण हेडकॅशर म्हणून निवड झाली होती. म्हणजे परत पुणे सोडावे लागणार होते. हेड कॅशियर म्हणून अकलूजला बदली झाली. तेथील कॉलेज दुपारचे होते. परत युनिव्हर्सिटी शिवाजी म्हणजे कोल्हानपुरच्या या कार्यक्षेत्रात. तेव्हा करस्पॉन्डन्स कोर्सच्या माध्यमातून प्रयत्न केला पण ते जमू शकले नाही कारण पत्रके वाचून विषयाचे आकलन होत नाही असो. नंतर औरंगाबाद येथे नवीन ब्रँच होत होती त्यासाठी प्रयत्न केला आणि औरंगाबादला क्रांतिचौक या शाखेसाठी हेड कॅशियर म्हणून बदली झाली. येथे सकाळचे कॉलेज

आहे पण मी तेथे ऑक्टोबरमध्ये गेलो असल्यामुळे फर्स्ट इअर आर्टस्ला प्रवेश घेण्यासाठी १९७३ चे जून महिन्यांपर्यंत थांबणे भाग होते.

म्हणजे अर्वीला नागपूर युनिव्हर्सिटी, बारामतीला पूणे विद्यापीठ, अकलूजला शिवाजी विद्यापीठ आणि औरंगाबादला मराठवाडा विद्यापीठ असा प्रवास झाला.

जून १९७३ मध्ये स्टेशनरोड औरंगाबाद येथे देवगिरी कॉलेजमध्ये नाव घातले. कॉलेज सकाळचे व राहत असलेल्या कॉलनीच्या समोरच होते. आता येथे (औरंगाबादला) निदान तीन वर्षे राहून पदवी प्राप्त करू शकू असे वाटले. पण कसले काय? कॉलेज सुरू झाल्यावर १-२ महिन्यात मराठवाडा विद्यापीठाचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर करावे म्हणून मोठे आंदोलन सुरु झाले. विद्यार्थ्यांनी आंदोलनास हिंसक वळण दिले. कॉलेजेस बंद पडली. तेव्हा नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने या म्हणीचा प्रत्यय आला. बरे! आंदोलन लवकर थांबेल, परत कॉलेजेस सुरू होतील ही आशा होती. पण ग्रेड १ चे प्रमोशन मिळाले व मराठवाड्यात तेव्हा दुसरी ब्रँच नसल्यामुळे अहमदनगरला बदली झाली. तेथे काम खूप व अकौंटंटचा चार्ज! नगर कॉलेज अगदी जवळ असूनही १९५३ साली अर्धवट सोडलेले कॉलेज परत सुरू करू अशी आशा होती. पण लगेच पुणे मेन ब्रँचला बदली झाली. तो काळ आणीबाणीचा होता. पुढे मेन ब्रँचला गव्हर्नमेंट डिव्हीजन म्हणजे सकाळी ९ ते रात्री ९ असा कामाचा रेटा. तेव्हा लक्षात आले की आयुष्यात ही गोष्ट अशीच राहून जाणार!

**गोविंद भा. बागूल, पुणे, मो. ९४२३५५८३५७**

## तृतीय पारितोषिक विजेता लेख
## स्त्री विभाग
### जीवनातील सर्वोच्च ध्येय

माझे १०-११ वर्षांचे वय. घराजवळच्या देवळात रात्रीच्या वेळी कीर्तनाचा सप्ताह चालू होता. कीर्तनामध्ये अनेक कथा ऐकायला मिळत म्हणून कीर्तन ऐकायला जायला मला फार आवडत असे. कीर्तनकारही त्या काळी नावाजलेले होते. गोड गळा, थोडा अभिनय, उत्कृष्ट वक्तृत्व, कीर्तनकाराला आवश्यक असलेले खूप पाठांतर, पुराणे, इतिहास यांबरोबरच वर्तमानाचीही खूप माहिती आणि सुंदर सादरीकरण यामुळे खरोखरच सर्व श्रोते कीर्तनरंगात तल्लीन होत असत. अर्थात कथेकरीबुवांमध्ये इतके सारे गुण होते हे मी मोठी झाल्यावरच माझ्या लक्षात आले, जेव्हा अनेकांची रूक्ष, रटाळ भाषणे ऐकण्याचे प्रसंग आले तेव्हा! पण श्रोत्याना खिळवून ठेवण्याची बुवांची शक्ती त्या वयातही जाणवत असे.

बुवांनी पूर्वरंगात एक दोहा घेतला होता. - कबीराचा. तल्लीन होऊन बुवा म्हणत होते,

'जन तुम आयो जगत में, जग हसे तुम रोय
ऐसी करनी कर चलो, पीछे हास न होय.'

दोहा म्हणून झाल्यावर बुवांनी निरूपणाला सुरूवात केली. कबीर म्हणतात, ''आपण जन्माला येतो तेव्हा आपण रडत असतो आणि आपले सगळे सगेसोयरे आनंदाने हसत असतात. ''रडणे आणि हसणे या परस्परविरोधी क्रियांवर भर देत बुवा नीरुपण करत होते आणि शेवटी ते म्हणाले, कबीर म्हणतात, ''ऐसी करनी कर चलो, पिछे हास ना होय.'' 'हे मानवा आयुष्यात असे काहीतरी करून दाखव. आयुष्य इतक्या चांगल्या रितीने सार्थकी लाव, की जेव्हा तू हे जग सोडून जाशील, तेव्हा मात्र मागे राहिलेले कोणीही हसणार नाही, तुझी टवाळी करणार नाही. बरं झालं, गेला/गेली ते असं म्हणून तुझ्या वाईट कर्मांची मोजदाद करणार नाही.''

त्या संस्कारक्षम वयात ऐकलेले ते कीर्तन अजूनही माझ्या मनात घर करून आहे. त्यावेळी माझ्या चिमुकल्या मेंदूचा त्या दोह्याने ताबाच घेतला जणू काही. मला वाटतं, त्याचवेळी माझ्या आयुष्यातील माझे सर्वोच्च ध्येय माझ्याही नकळत ठरून गेलं असावं. आयुष्य असं जगायचं की आपण हयात नसताना कोणी आपली आठवण काढलीच तर भले त्या व्यक्तीच्या डोळ्यात अश्रू नाही तरळले तरी चालतील पण आपण गेल्याचा आनंद मनातल्या मनात सुद्धा साजरा करण्याची इच्छा त्या व्यक्तीला होऊ नये. अर्थात त्या वयात हे आपल्या आयुष्यातील सर्वोच्च ध्येय आहे/असावं अशी काही जाणीव झाली नव्हती. पण तो विचार माझ्या मनात खोल रुतून बसला हे मात्र निश्चित.

वयाने वाढत असताना अनेक टप्प्यांवर अनेक छोटी छोटी ध्येये निश्चितच समोर येत होती. शालेय वयात अर्थातच अभ्यासात उत्तम गुण मिळवण्याचे ध्येय प्रत्येकाचेच असते. त्यातही घरची आर्थिक परिस्थिती 'सर्वसाधारण'च्याही थोडी खालीच असल्याने एक ध्येय कायम नजरेसमोर होते. चांगले शिक्षण घेऊन आई-वडिलांचे पांग फेडण्याचे. हे शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मिळवणे व ती टिकवणे ही अत्यावश्यक गोष्ट होती. त्या शालेय वयात माझे ते एकमेव ध्येय होते. माझ्या कुवतीप्रमाणे, ते यथायोग्य रितीने साध्यही झाले. पुढे पदव्यूत्तर शिक्षण घेणेही, शिकण्याच्या एकमेव ध्येयाने, ध्यासानेच साध्य झाले. आपली मुलगी इतकी चांगली शिकली याचा आनंद आई वडिलांच्या डोळ्यात प्रतिबिंबित झालेला पाहिला तेव्हा ध्येयपूर्तीपेक्षासुद्धा आपण त्यांना आनंदी करू शकलो याचे समाधान जास्त वाटले होते. गरिबीचे ते असह्य ओझे आईवडिलांच्या खांद्यावरून उतरवण्यासाठी अर्थार्जन करण्याची क्षमता आता साध्य झाली होती. या टप्प्यावर कसा कोण जाणे,

कबीर पुन्हा आठवला, 'ऐसी करनी कर चलो, पीछे हास ना होय.'

त्यावेळी परत एक छोटंसं ध्येय डोळ्यांसमोर उभं राहिलं. आता अर्थाजन करायचंच आहे आणि त्यासाठी नोकरी करणं आवश्यक आहे. नोकरी करत असताना सचोटी आणि कामसुपणा ते आपल्यातले गुण सदैव घासुन पुसून लख्ख ठेवयाचे आहेत. जिथे नोकरी करू तिथे आपल्या कामाचा ठसा उमटवला पाहिजे. आपल्या सहकाऱ्यांना आणि वरिष्ठांनाही आपण हवेहवेसे वाटलो पाहिजे. हे ध्येय कितपत साध्य झाले याचे मोजमाप अर्थातच मी करायचे नाही. परंतु ऑफीसमध्ये ज्या तऱ्हेने माझ्या कामाला प्रतिसाद मिळत गेला त्यावरून शंभर टक्के नसेल पण उत्तम गुणांनी पास होण्याइतके माझे ध्येय साध्य झाले असावे अर्थातच नोकरीमध्ये वरच्या पदांवर चढण्याची आकांक्षा नव्हती असे कसे असेल? पण त्याचे फार मोठे महत्त्वाकांक्षी ध्येय मी माझ्या डोळ्यांसमोर ठेवले नव्हते.

एकदा विवाह बंधनात अडकल्यांनंतर केवळ ऑफीसमधलं काम एवढंच एकमेव महत्त्वाचं न मानता, स्वेच्छेने स्वीकारलेल्या सांसारिक जबाबदाऱ्या उत्तम रितीने पार पाडणं हे मला तितकंच महत्त्वाचं वाटत होतं आणि म्हणून संसार करताना आपल्या नोकरीमुळे संसारात संघर्ष निर्माण होणार नाही याची काळजी घेणं हे नोकरीतल्या माझ्या वैयक्तिक प्रगती इतकंच महत्त्वाचं मानलं.

यावेळी रिचर्ड बारव यांचं 'जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल' हे पुस्तक मला खूप मार्गदर्शन करणारं ठरलं. सीगल्सच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे केवळ खाद्य मिळविण्यासाठी उडण्यात समाधान न मानता आकाशात उंच उंच भराऱ्या घेण्याचं आपलं ध्येय साध्य करण्यासाठी त्या सिगलने - जोनाथनने अपार कष्ट घेतले पण जेव्हा ते साध्य झालं तेव्हा त्या अद्भूत जगात रमून न जाता आपल्या इतर बांधवांपैकी जे कोणी इच्छुक असतील, त्यांना हे अत्यूच्च ध्येय साध्य करण्यासाठी मदत करायला, मार्गदर्शन करायला तो परत पृथ्वीवर आला.

त्या जोनाथनशी माझी तुलना करण्याचं साहस मी करणार नाही, परंतु त्याने माझ्या विचारांना एक नक्की दिशा दिली की वैयक्तिक प्रगती करणं हे नक्कीच चांगलं; अल्पसंतुष्ट असूच नये पण ती प्रगती करताना आपल्या कुटुंबीयांकडून प्रत्येक वेळी त्यांनीच आपल्याला समजून घ्यावं अशी अपेक्षा न करता, आपल्याला त्यांच्यासोबत राहून, आपल्या प्रगतीचा आनंद खऱ्याखुऱ्या अर्थाने त्यांनाही होईल इतक्याच वेगाने आपल्याला पुढे जायचं आहे. मला वाटतं, माझ्या कुटुंबीयांकडून मला नेहमीच जे सहकार्य, प्रेम, आदर मिळत गेला तो लक्षात घेता माझं हे ध्येयही बऱ्यापैकी साध्य झालं असावं.

संसारात स्थिर झाल्यावर, आजूबाजूच्या समाजाचं आपणही काही देणं लागतो ही नेहमीच मनात जागी असणारी जाणीव, प्रकर्षाने जागी झाली आणि 'जन्म असावा देण्यासाठी' हे शब्दश: जरी नाही, तरी आपल्या आर्थिक परिस्थितीला झेपेल अशा रितीने, चांगल्या सामाजिक संस्थांच्या आवाहनांना प्रतिसाद देऊन आपला खारीचा वाटा उचलायचंही प्रयत्न केला. अर्थातच एका सर्वसामान्य संसारी स्त्रीचा खरोखरच तो खारीचाच वाटा होता. परंतु त्यातून मनाला एक प्रकारचं समाधान मिळत गेलं. मोठी मोठी ध्येयं डोळ्यासमोर ठेवून त्यासाठी वेळप्रसंगी सर्वस्वाचा त्याग करून, अतोनात कष्ट झेलून, त्या ध्येयपूर्तीसाठी मार्गक्रमणा करण्याची माझी कुवत नव्हती. आपल्या शक्तीच्या मर्यादा आपल्याला माहित असल्या की आपले पाय जमिनीवर राहतात. पण असं जरी असलं तरी बाहेरचं जग किती मोठं आहे याची पुरेशी जाणीव नेहमीच मनात जागी होती. करणाऱ्यासाठी Sky is the limit असल्याचं भान होतं आणि त्याचवेळी आपल्या पंखात किती ताकद आहे याचं वस्तुनिष्ठ ज्ञानही होतं.

त्यामुळेच आपल्या हातून काही भव्य दिव्य घडेल अशा भ्रमात मी कधीच नव्हते; पण गरूडासारखं उडणं जमणार नाही म्हणून चिमणीने उडूच नये का? हा विचार मनात ठेवून नजरेसमोर असाध्य ध्येय न ठेवता, छोटी छोटी परंतु आपल्या व्यक्तिमत्त्वाला काही आयाम देणारी, त्याचवेळी आपल्या सग्या सोयऱ्यांना त्रास न देता, त्यांना न दुखावता, साध्य होऊ शकणारी ध्येये डोळ्यासमोर ठेवली आणि ती साध्य करण्यासाठी मात्र मनापासून प्रयत्न केले. काही साध्य झाली, काही अर्धवट सोडावी लागली पण प्रयत्न सच्चे होते.

या प्रत्येक वेळी वर उल्लेख केलेला कबीराचा दोहा सतत माझा सांगाती होता. 'ऐसी करनी कर चलो, पीछे हास न होय'

आज सेवानिवृत्तीनंतर, प्रापंचिक जबाबदाऱ्यातून मुक्त झाल्यानंतर काही वेळा थबकून मागे वळून पाहते तेव्हा एक गोष्ट लक्षात येते की, आयुष्यात तसं नाव घेण्यासारखं आपण काहीच नाही करू शकलो. आपल्या जगण्यामुळे हे जग अधिक सुंदर करण्यासाठी, ते अधिक प्रगत करण्यासाठी आपण काय केलं? हा प्रश्न मनाला विचारला तर त्यांचं स्पष्ट उत्तर येतं 'काहीच नाही'. पण त्याचबरोबर हेही लक्षात येतं की भले आपण हे जग अधिक सुंदर, अधिक प्रगत नाही करू शकलो पण निश्चितच, ते आहे त्यापेक्षा अधिक कुरूप करण्यात आपली शक्ती खर्च नाही केली. या जगाला अधोगतीकडे न्यायलाही आपण कारणीभूत नाही झालो.

आपली ध्येये छोटी असतील पण ती विध्वंसक नव्हती. समाजाचं मोठं परिमाण बाजूला ठेवलं तरी आपलं जे काही छोटं, कौटुंबिक, सामाजिक वर्तुळ होतं/आहे त्या वर्तुळाला दु:खी

करणारी नव्हती. त्या छोट्याश्या परिघात जमेल तेवढं सुख वाटण्याचाच आपण प्रयत्न केला. आपण आपली जी काही प्रगती केली ती आपल्या कुटुंबाला मागे टाकून नाही तर त्यांच्याबरोबर राहून केली. 'कांदा, मुळा भाजी हीच विठाई माझी.' म्हणणाऱ्या सावता माळ्याप्रमाणेच आपल्या कर्तव्याला आपण कधीच नजरेआड नाही केलं. कालानुक्रमाने जी कर्तव्ये आपण पार पाडणे अत्यावश्यक होतं, ती सारी कर्तव्ये योग्य रितीने पुरी करण्याचा आपण निष्ठेने प्रयत्न केला.

आज सर्वार्थाने एक प्रकारची कृतकृत्यता आपण अनुभवू शकतो आहोत. वेळोवेळी आपण घेतलेल्या निर्णयांमुळे पश्चात्तापाची पाळी आपल्यावर आली नाही. एका सर्वसामान्य व्यक्तीसाठी आणखी काय हवं?

'ऐसी करनी कर चलो, पीछे हास न होय' हे सांगताना कबीराला कदाचित, माणसाने काही भव्यदिव्य ध्येय नजरेसमोर ठेवून ते साध्य करावं असाही संदेश द्यायचा असेल, पण माझ्यापुरता मी त्या दोह्याचा अर्थ असा लावला की, माझ्या मृत्यूनंतर, माझ्याबद्दल कोणी चार चांगले शब्द नाही बोलले तरी एकवेळ चालेल पण माझ्या मृत्युनंतरही माझ्याबद्दलच्या वाईट आठवणी कोणाच्या मनात जाग्या होऊ नयेत. माझ्या जाण्यामुळे हे जग जरा उजळून निघालं असं कोणाला वाटू नये, हेच मी माझ्या जीवनाचं सर्वोच्च ध्येय मानलं आणि ते गाठण्याचा मनापासून प्रयत्न केला.

ते मला साध्य झालं की नाही, हे मला कधीच नाही कळणार कारण त्याची परीक्षा होईल, तेव्हा मी या जगात नसेन.

**उर्मिला परांजपे, मुंबई, मो. ९८२०४४०३४८**

* * * * * * *

## Obituary

Shri Mukundrao Karmarkarji, age 78, expired on 14 September 2015. He was the founder president of Sangli unit of our Association and worked till his death for the cause of pensioners' problems, especially for the 7th bipartite. He was very resourceful straight forward person and very kind and selfless person.

After his demise his eyes & body were donated. His wife also had donated her eyes and body after her demise.

May the soul lay in peace !

***- Vinayak Tamhankar***, Sangli

******************************************

## संगणक आणि मी

मी बँकेच्या नोकरीतून निवृत्त होईपर्यंत संगणकाचा आणि माझा कधीही संबंध आला नाही. नंतर संगणकावर गेम खेळणे एवढेच मी करत होतो. याबरोबरच वाचन, टी.व्ही. बघणे आणि फिरावयास जाणे हे उद्योग चालू होते. वाचनामुळे मराठी, इंग्लिश आणि हिंदी या भाषांची आवड निर्माण झाली. यातूनच मला असलेला भरपूर रिकामा वेळ पाहून मी संगणकाचा उपयोग अन्य कामासाठी करू शकेन असे माझ्या पत्नीला वाटले आणि मग सुरू झाला तो अशा कामाचा शोध!

परंतु यात एकच गोची होती आणि ती म्हणजे वयाच्या ६५व्या वर्षापर्यंत गेम खेळण्याशिवाय संगणकाचे कसलेही ज्ञान नव्हते. मग शेवटी ठरवले की 'चुका करा आणि त्यातूनच शिका' या तत्वाप्रमाणे संगणक शिकायचा. एक छोटीशी अडचण होती ती म्हणजे टायपींगचे बाबतीत नन्नाचा पाढा.

तेव्हाच या क्षेत्रात उडी घ्यायची ठरवली आणि पत्नीने वर्तमनपत्रातील छोट्या जाहिराती पाहावयास सुरुवात केली. त्यातूनच एक घरबसल्या भाषांतरे करून देण्यासंबंधीची जाहिरात आढळली. तिला प्रतिसाद दिला, आणि बिनधास्त भेटावयास गेलो. त्यांना माझ्या संगणक हाताळणीविषयी पूर्ण कल्पना दिली आणि तरीसुद्धा मी हे काम करू शकेन याची ग्वाहीही दिली. त्यावर त्यांनी मला नुमन्यादाखल इंग्लिश ते मराठी असे भाषांतर करण्याचे काम दिले जे कायदेशीर कागदपत्रांचे होते.

पंचाईत अशी होती की मला इंग्लिशच काय पण मराठी टायपिंगदेखील येत नव्हते. त्यामुळे माझ्या सॉफ्टवेअर इंजीनिअर मुलाच्या मदतीने Google Transliteration ही सोय संगणकात डाऊनलोड करून घेतली ज्यामुळे शब्दांच्या उच्चारानुसार इंग्लिश अक्षरे टाईप केल्याने मराठी शब्द उमटतात. देवावर हवाला ठेवून भाषांतराला सुरुवात केली. चुकतमाकत टायपिंग करण्यात भरपूर वेळ घालवून मनाजोगता जॉब पूर्ण केला आणि पाठवला. कायद्याची किल्ष्ट भाषा असूनदेखील तो त्या एजन्सीला पसंत पडला आणि पहिल्याच कामाचे रु.१०००/- मिळाले.

त्यामुळे हुरूप येऊन मुलाच्या मदतीने हळूहळू कोणताही क्लास न लावता घरच्याघरीच संगणक वापरण्यास व मराठी/हिंदी टायपिंग करण्यास शिकलो. हे करताना मुलानेदेखील एक मोलाचा मंत्र दिला तो म्हणजे दुसऱ्यावर जास्त अवलंबून न राहता स्वत: प्रयत्न करा, चुका होतील त्यातूनच शिका म्हणजे आपोआपच नवे काम आत्मसात कराल.

त्याप्रमाणे निरनिराळ्या विषयांचे शब्दकोश डाऊनलोड करणे, फोल्डर बनतवणे, ई-मेलद्वारे तयार कामे पाठविणे, यू-ट्यूबमार्फत गाणी/सिनेमे डाऊनलोड करून ती ऐकणे/ पाहणे आदी सर्व गोष्टी आता मी सराईतपणे करू शकतो.

वयाच्या ६९ व्या वर्षीसुद्धा जोमाने शासकीय परिपत्रके वा अन्य मजकूर, कायदा, अभियांत्रिकी, पोलीस केसेस, वैद्यकीय, कंपन्यांची माहितीपत्रके, औषधनिर्माण जाहिराती अशी विविध क्षेत्रातील भाषांतराची कामे करून देतो. घरबसल्या चार पैसे देखील मिळवतो. अर्थातच याचे सर्व श्रेय माझी पत्नी सौ. विजया, मुलगा चिन्मय आणि मुलगी मुक्ता ह्यांना आहे. त्यामुळे माझ्यापुढे वेळ कसा घालवावा हा प्रश्न नसून वेळ कसा पुरवावा हा आहे कारण एकीकडे वाचन आणि टी.व्ही. बघणे चालू आहेच.

तरी माझ्या निवृत्त मित्रांसाठी माझे कळकळीचे आवाहन आहे की प्रयत्न करा आणि संगणक शिका, एक नवीनच भांडार तुम्हाला खुले होईल. वर्तमानपत्रे वाचणे, टी.व्ही. मालिका/सिनेमे पाहणे, आवडीची गाणी ऐकणे आदी अनेक गोष्टी तुम्ही करू शकाल आणि मुख्य म्हणजे मी आता वेळ कसा घालवू हा प्रश्न तुम्हाला छळणार नाही.

**यशवंत ओगले पुणे**

**१३/१५ मो. ९०४९४६३५०**

* * * *

## विनोद

'माझे विद्यार्थी'

भास्कर, प्रभाकर आणि मधूकर अध्यापनाची आवड असलेल्या या जुन्या तीन मित्रांनी शिक्षक व्हायचे ठरविले. तिघे शिक्षक झाले पण तिघांच्या नेमणूका वेगवेगळ्या ठिकाणी. प्रभाकर नागपूरला, मधुकर लातूरला, भास्करला मात्र पुण्यातच नोकरी मिळाली. खूप वर्षांनी तिघे भेटल्यावर, गप्पांचा ओघ सुरू

मधुकर - ''महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री माझे विद्यार्थी होते.''

प्रभाकर - ''माजी? अरे! सध्याचे मुख्यमंत्री माझे विद्यार्थी होते.''

भास्कर - ''तुम्ही मुख्यमंत्र्यांचे एवढं काय सांगताय? सध्या माझ्या वर्गातील दोन मुलांची नावे सांगितली तर तुम्हाला आश्चर्य वाटेल.''

मधुकर, प्रभाकर (कुतुहलाने) - ''सांग सांग.''

भास्कर - ''दोघेही सध्या आंतरराष्ट्रीय राजकारणात आहेत. एक ओंबामा, दुसरा पुतिन.''

मधुकर - ''ते पुण्यात कशाला येतील. शिकायला? त्यांची पूर्ण नावे सांग.''

भास्कर - ओबामा - ओंकार बाळकृष्ण माने

पुतिन - पुष्कर त्रिंबक नलावडे

**अरुण तुळजापूरकर, पुणे**

**१५/१५ मोबा. : ९८९०२२६१५४**

## ''प्रकाशयात्री''

आपले पुसद (जि. यवतमाळ) येथील सभासद श्री. पुंडलिक भेंडे, हे उत्तम कवी आहेत. निवृत्तीनंतर तर त्यांच्या प्रतिभेला नवीन घुमारे फुटले आहेत. आतापर्यंत त्यांच्या अनेक कविता आपल्या 'संवाद'मधून प्रसिद्ध झाल्या आहेत, हे काव्य-रसिकांना नक्कीच स्मरत असेल. 'संवाद' व्यतिरिक्त त्यांच्या अनेक कविता 'दैनिक विदर्भ मतदार' यवतमाळ, 'दैनिक हिंदुस्थान' अमरावती, 'दक्षता' मासिक मुंबई इ. नियतकालिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

२०११ मध्ये त्यांच्या कवितांचा संग्रह 'आनंदयात्री' या नावाने प्रसिद्ध झाला, त्याला रसिकांकडून चांगली दाद मिळाली. त्या प्रेरणेतून त्यांनी ७० कविता असलेला काव्यसंग्रह 'प्रकाशयात्री' या नावाने नुकताच प्रकाशित केला. तो जानेवारी २०१५ ला 'सुगम प्रकाशन' यांनी प्रकाशित केला आहे.

समाजात व देशात घडत असलेल्या विविध चांगल्या-वाईट घटनांचा, त्यांच्या संवेदनशील मनाने काव्य-रूपाने वेध घेतलेला आहे. सामाजिक व राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवून, सकारात्मक दृष्टीने त्यांनी काव्यरचना केलेली आहे. साध्या साध्या विचारातून त्यांनी काव्य-सुमने फुलवली आहेत.

श्री. भेंडे यांना पुढील काव्य-रचनांसाठी शुभेच्छा!

**वसंत धुपकर, पुणे**

## अभिनंदनीय

सातारा येथील सभासद श्री. सुभाष शंकर सरदेशमुख हे जून १९६५ पासून दैनंदिनी लिहित आहेत. दरवर्षी १ जानेवारीस ते परिचिताचे हस्ते डायरीचे उद्घाटन करतात. तसेच मे १९६५ मध्ये त्यांनी काव्यलेखनास सुरुवात केली. त्यांची पहिली कविता साताऱ्यातील 'सज्जनगड' मासिकात १९६८ मध्ये (सोळाव्या वर्षी) प्रसिद्ध झाली होती. त्यांचे मराठी-हिंदी सहा कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. अनेक मासिकातून, 'संवाद'मधून त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यानां अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

श्री. सरदेशमुख यांचे या उपक्रमाबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन. सेक्रेटरी

### *Appeal for Donation for 'Samvad'*

**Those members who have so far, not given any donation for 'Samvad' are once again requested to donate at least Rs. 1,000/- (One time donation only) for 'Samvad'**

*- Secretary*

## आई

आता आई कुणा म्हणू मी ।।धृ।।
उदर तुझे माझी जन्मभूमी।
तव उदरी आलो जन्मास मी।।
तुझ्यामुळे विश्व पाहिले मी।
फेडू कसे तव उपकार मी ।।१।।
बालजीवन तव आधारे जगलो मी।
ईश तुझे रूप उशीरा जाणले मी।।
कळत नकळत तुला दुखावले असेल मी।
दयाळू आहेस तू क्षमा मागतो मी।।२।।
मनोभावे यथाशक्ती सेवा केली मी।
गोड मानावी विनंती करतो मी।।
आता तुझी प्रेमळ हाक ऐकणार नाही मी।
काळाच्या गळा मिठीने दु:खी झालो मी।।३।।
तव अंगी गुणांस वंदन करतो मी।
सुखी व्हावे परलोक जीवन ईशास सांगतो मी।।
लवकर यावे इहलोकी कामना करतो मी।
पुढील जन्मी आई म्हणून हाक मारीन मी।।४।।

**१२/१५ गणेश गुर्जर (पुणे)**

## मला वाटतं.....

आई वडीलांनी जन्म दिला, जगातील अनुभव घेण्यासाठी
हाती पायी धड आहोत, हेच मोठे भाग्य आपल्यासाठी
साठीपर्यंतच्या अनुभवांची फार मोठी व्हरायटी
त्यात दडलेल्या असतात सुखदु:खांच्या गाठी
सुख कसे असावे, कसे यावे, हे नसे आपल्या हाती
दु:खही असते तसेच, काय करावे त्यासाठी?
सुखी असावे जन्मभर, वाटते आपल्याला
काय यावे काय नको, आहे का हाती आपल्या
उगीच आपण म्हणत असतो, हे माझे हे तुझे।
सर्व आयुष्य जगायचे ओझे घेऊन हसायचे।
खरे-खोटे, खरे-खोटे नाटक सारखे वठवायचे।
नाटकातले आपले पात्र प्रामाणिकपणे साकारायचे।
नाटकाच्या स्टेजवरील चढ-उतार अनुभवायचे।
हातात पडतील तेवढे पैसे घेऊन जगायचे।
पण त्या जगण्याला कष्टाची अभिमानाची जोड असते
म्हणूनच माणूस जेवतो आहे सुखाने.

**१६/१५ सुरेखा लागू, पुणे**
**दूरध्वनी. ०२०-२४२६१५३४**

## पाकळ्यांची आसवे......

विसर आता तेज रविचे
अजून जे तुज आठवे
का गुलाबा सांडसी तू
पाकळ्यांची आसवे



रेखूनी गेला रवि
क्षितिजावरी रंगावली
दाहिदिशांतून आता
सांज उतरे भोवताली
परतली गाई गुरे
रानात फिरती काजवे
का गुलाबा सांडसी तू
पाकळ्यांची आसवे

दिवस सरता रात्र येते
रात्र सरता दिवस ये
चक्र हे आहे जगाचे
यात ना काही नवे
नष्ट होईल जे जे इथे
रूप घेण्याला नवे
का गुलाबा सांडसी तू
पाकळ्यांची आसवे.

**मधुकर सुळे, कुर्ला**
**११८/१४ मो.: ८९७६२३९३८७**

## वाटचाल

तुज झरा लाभला आहे उत्साहाचा
तुज कुंभ गवसला आहे आनंदाचा
तू जोडिलेस हे मंगल-अतूट नाते
ज्यायोगे झाला हर्ष फार चित्ताते
तू सांगितला मज अर्थच आयुष्याचा
सामना करावा धीराने दु:खाचा
ठेवून मुखावरी प्रसन्नतेचे लेणे
संतोष सर्वदा इतरांलागी देणे
लाभावा मजला नित्य तुझा सहवास
संपावा कधी न अपुला छान प्रवास
हे तुझे कधी ना फिटणारे ऋण आहे
मी वाटचाल या मार्गे करतो आहे

**सुभाष सरदेशमुख**
**३६/१५ मो. ९४२०४८५५६३**

## हे असं का?

चांगलं काही झालं तर
श्रेय मात्र स्वत:ला
चूक मोठी झाली तर
दोष सगळा दुसऱ्याला।।
मुलगा खूप शिकला तर
म्हणतात, ''मुलगा कुणाचा''?
वाईट संगतीने बिघडला तर
म्हणे, ''हा गुण नव्हे आमचा''।।
मुलं सुद्धा तशीच असतात
म्हणतात, ''घरचं वळण नाही खरं''
उच्चपदावरुन म्हणतात,
''हे सगळं आमचंच श्रेय बरं''
ऑफीसमध्ये कारकून म्हणतो
''साहेब सांगतो ते आम्ही करतो''
साहेब म्हणतो, ''काय करू?
कारकून स्वत:च्या मनासारखं वागतो''।।
दुसऱ्याच्या डोळ्यातील पटकन्
दिसतं सर्वांना कुसळ
कधीच लक्षात येत नाही
आपल्या डोळ्यातील मुसळ।।
सर्वांनाच चांगली वाटते
स्वत:ची भलावण
याचमुळे होत असते
स्वत:चीच भुलावण''
कठोर आत्मपरीक्षा
कुणालाच जमत नाही
जमली तरी उघडपणे
कुणी कबूल करीत नाही।।
माणसं असं का वागतात?
का वागतात कळत नाही
मानवाच्या स्वभावाचा
तळ कधी दिसत नाही

**१०९/१४** **सौ. उज्ज्वल ब्रम्हांडकर**

## स्नेहलता

या कवितेने वेड लाविले. तिचा मनाला लळा
ओठांमधुनी शब्द उमटती, प्रेम असो वा झळा!
व्याधाने वेधिले जेधवा, प्रणयातुर क्रौंचास
वाल्मिकीचे हृदय जाहले, विदीर्ण आणि उदास
कंठातून स्फुरली कविता, दाटुन येता गळा!
मिळे साथ कवितेची, जैसी उन्हामधे साउली
सुखात वा दु:खात भासते, मूर्तीमंत माउली
उस्फूर्त जागवी आप्तजनांच्या, अंतरी कळवळा!
कधी मिरवते ऐट आपुली छंदात होऊनी बद्ध
स्वच्छंदपणे कधी मुक्त विहरते, छेडित विचार-युद्ध
प्रेमाशी करी गुलगुल गोष्टी, शत्रूस दाखवी बळा!
वश होते ती कलाकलाने, सलज्ज प्रियेसम
बळजोरी जर कराल तिजशी, नाकी आणते दम
हृदयी पेटवे क्रोधाग्नि कधी फुलवे स्नेह-मळा!
कविता असते कधी कधी, फुलाहुनी नाजुक
वज्रासम ती अभेद्य कधी वा तुपाहुनी साजुक
'रवि'ला कधी जे नाही दिसले, दावील शब्दकळा!

**८१/१४** **गोविंद करमरकर**
**मो. ८८०५९५९८२४**

## अनामिकास

नजर चुकवूनी आलासी ठाण मांडूनी बसलासी ।।
अढळ झालासी तवठायी परतवू कैसे मी तुजसी।।
ठाण तुझे तु केलेस पक्के प्रयत्न माझे पडलेत फिक्के ।।
पीडा तुझी मम देहासी आक्रंदिते मन रात्रंदिनी ।।
सावधान असे मी बहूअंतरी, परी हार मानिली तुजपुढती
उपाय माझे सारे थकले डॉक्टर आणि वैद्य संपले।।
घेऊनी झाली दवा औषधे, मेडिसिन्स तर थकूनि गेली ।।
उपाय आता तूच सुचवी शांत कसे मी करू तुजसी ।।
पेढा, लाडू आणि जिलेबी आहारातून गायब झाली।।
रूचे जरी बासुंदी, बर्फी, गोडी संपली आहारातली।।
पेरू आंबा, केळी, अननस मोह तयांचा नाही आवरत ।।
आता जगणे तुज सांगाती जिणे मुष्कील झाले तुजवाचोनी

**श. मु. हुद्देदार,अहमदनगर**
**मो. ९९७०५३१७६५**

पुस्तकपरीक्षण

१) पर्यावरण २) शून्य ते दहा अर्थात अंकांचं महत्त्व
लेखक - श्री. बी. के. कुलकर्णी

## पर्यावरण

अहमदनगरमधील आपले सभासद श्री. बी. के कुलकर्णी यांची वरील दोन पुस्तके नुकतीच वाचनात आली. 'पर्यावरण' हे पुस्तक त्यांनी पर्यावरणासंबंधी लिहीलेल्या निरनिराळ्या लेखांचे संकलन आहे. सर्व लेख वाचल्यानंतर पर्यायरणासंबंधी लेखकाची जागरूकता, आस्था, तळमळ प्रत्ययास येते ते लिहितात. 'मानवाला पृथ्वीवरील इतर घटकांच्या तुलनेत सृष्टीनिर्मात्याने अधिक बुद्धी प्रदान केली आहे. त्यामुळे मानव अधिकाधिक प्रगती करू पाहतो आहे. परंतु हे करताना निसर्गसंपत्तीची भरपूर लूट होत असल्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडला आहे. तसेच लिहिता लिहिता निसर्गातील घटकांचे पशुपक्ष्यांचे संरक्षण हा प्रश्न भूतदयेचा नसून निसर्गाच्या समतोलाचा आहे आणि मानवी अस्तित्वाचा आहे (पृष्ठ १६) 'पाणी हे सर्वांचे जन्मस्थान आहे व सर्व जीवांचे जीवन आहे', (पृष्ठ २९) 'काळजी करण्यापेक्षा काळजी घेणे महत्त्वाचे असते, (पृष्ठ ७७) अशी सुंदर सुंदर, मनाला भावणारी, पटणारी वाक्ये लेखक लेखणीच्या भरात सहज लिहून जातो.

पुस्तकातील सर्वच लेख उद्बोधक, वाचनीय तसेच पर्यावरणसंबंधीची वाचकांच्या मनात जाणीव निर्माण करणारे आहेत.

### शून्य ते दहा अर्थात अंकांचं महत्त्व

शून्य ते दहा अंकासंबंधी प्रचलित असलेले संदर्भ एकत्र करून त्यांचे संकलन म्हणजेच हे पुस्तक. प्रत्येक अंकांचे वैशिष्ट्य, त्या अंकानुरूप प्रचलित झालेले विविध शब्द, गुण, अवगुण, धार्मिक विधी, यासंबंधीची सविस्तर माहिती वाचकांना आकड्यासंबंधीच्या निरनिराळ्या लेखांमधून मिळते. ९ च्या पाढ्यातील कोणताही आकडा घेतला व त्यातील दोन्ही अंकांची बेरीज केली तर उत्तर ९ च येते. ९ च्या आकड्याची ही करामत ज्ञानात नक्कीच भर घालणारी तशीच मनोरंजक आहे.

वरील दोन्ही पुस्तके वाचनीय झाली आहेत. सभासदांनी जरूर ती वाचावीत. लेखक श्री. बी. के. कुलकर्णी यांचे त्याबद्दल अभिनंदन आणि त्यांच्या पुढील लेखन कार्यास शुभेच्छा.

संपर्क
श्री. बी. के कुलकर्णी
अहमदनगर , मोबा. ९८२२४६५४१०

प्रभाकर गुपचूप, पुणे
मो. ९८८१५७९४९९

### कष्टाचे सार्थक

पुणे येथील सभासद श्री. ज्ञानेश्वर ताठे यांच्या 'कष्टाचे सार्थक' हे पुस्तक ठाणे येथे २०१४ मध्ये प्रकाशित झाले. आपल्या जीवनाचा बालपणापासून ते स्टेट बँकेतून सेवानिवृत्त होईपर्यंतचा खडतर प्रवास अत्यंत ओघवत्या शैलीत, सोप्या भाषेत पुस्तकात वर्णन केला आहे.

विशेषत: लहानशा खेड्यात गेलेले बालपण, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी घ्यावे लागलेले कष्ट, त्यासाठी लेखकाने दाखविलेली जिद्द कौतुकास्पद आहे. पदवी प्राप्त केल्यानंतर प्रथम आर. सी.एफ. ह्या कंपनीत केलेली नोकरी, नंतर एस.बी.आय. मध्ये नोकरी मिळाल्यावर आलेली आर्थिक स्थिरता, दुर्देवाने जीवनसाथीचे आजारात झालेले अकाली निधन, त्यातूनही दोन मुलांचे आई आणि वडिल ह्या दुहेरी भूमिकेतून केलेले योग्य पालनपोषण, त्यांच्यावर केलेले आदर्श संस्कार, त्यांचे संसार मार्गी लावून दिल्यानंतर त्यांच्या सुखात आपले सुख शोधणारे, आता समाधानाचे व तृप्ततेचे निवृत्त जीवन उपभोगणारे श्री. ताठे यांनी सतत सकारात्मक विचार ठेऊन जीवनात आलेले कटु क्षण, दु:खद घटना यांचेवर मात केलेली आहे. हा सर्व जीवनप्रवास वाचनिय झालेला आहे. पुस्तक वाचताना सुखान्त शेवट असलेला. एक काट्याकुट्यातून केलेला खडतर जीवन प्रवासाचा चित्रपट उलगडत जातो.

श्री. ताठे यांचे त्याबद्दल अभिनंदन व त्यांच्या नवीन लेखनासाठी शुभेच्छा !

वसंत धुपकर
मोबा. ८९७५२१८०४९

### ''नया-जमाना'' काव्य संग्रह

धुळे येथील सभासद श्री.अशोक बागुल यांच्या उर्दू मिश्रीत हिंदी कवितांचा एक छोटा संग्रह नुकताच प्रथमेश प्रकाशन धुळे यांनी प्रकाशित केला आहे. त्यात एकूण १२ कविता व ४० रुबाईया आहेत. २ ओळीच्या हिंदी उर्दु शेरांप्रमाणे ४ ओळींचा रुबाईया हा प्रकार पर्शियन कवि उमरखय्याम ह्या कविने प्रकाशात आणला व लोकप्रिय केला. श्री.बागुल यांनी तसा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कवितांचा व रूबाईयांचा विषय सध्या असलेल्या धार्मिक असहिष्णु वातावरणाचा, त्यांच्या विचारी मनावर झालेला परिणाम आहे. देशभक्ति हाही विषय त्यांनी येथे हाताळलेला आहे.

यापूर्वी श्री.बागुल यांचे 'निसर्ग हाच आपला गुरू' ह्या नावाचे सुंदर विचारांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. श्री.अशोक बागुल यांच्या भावी लेखनास शुभेच्छा!

वसंत धुपकर
मोबा. ८९७५२१८०४९

## निवृत्तीच्या भावना

बालपण सरले,
तारुण्य बहरले,
करीता कर्तव्ये; सरली अनेक वर्षे
बेरीज-वजाबाक्या, नफा-तोटा
आकडेमोड वा कागदी नोटा

आयुष्यही का असेच असते
आठवणींच्या बेरजा
काळजीच्या वजाबाक्या
उण्या-दुण्यांचा भागाकार अन्
आनंदाचा गुणाकार

अनुभवांची गाठोडी अन्
सुखदु:खाच्या अनंत ठेवी
त्याच तर जपायच्या स्व: हृदयी!
येतात कधी त्या मित्र होऊनी सोबतीसाठी

कधी ओलावल्या पापण्यांना मायेच्या स्पर्शासाठी
असतात कधी सुगंधापरी
सुखदु:खाच्या रिमझिम सरी
कधी सौख्याच्याही सरीवर सरी!

सोबत हसणं, सोबत जगणं
आठवणींच्या सोबत फिरणं
हीच साथ सर्वोपरी
निवृत्तीनंतरच आयुष्य जगणं
असंच असतं खरोखरी, खरोखरी!

**बाळ मराठे, पुणे.**
**२६/१५ मो. ९८२२३२९७७०**

## विनोद

डॉक्टर : या काका, काय त्रास होतो? तपासून घेतो.
पेशंट : अशक्तपणा, ताप येतो.
डॉक्टर : दारू पिता काय?
पेशंट : तुम्ही घेत असाल तर थोडी घेतो.

**पु.नि.देशपांडे, अमरावती**
**२०/१५ मो. ९७६४९७४४२२**

## संयम

अंतरीचा जिव्हाळा जीवनात संयम
उच्च ध्येयाने होती सारी कर्मे उत्तम
शंकराचे मंदिरी होई कासव दर्शन
राखिली त्या गुरूने इंद्रिये स्वाधीन ।।१।।
सृष्टीही करी संयमाचे पालन
वृक्षा वृक्षांना ठेविती मुळेच बांधून
फांदी फांदी पोहोचे उंच गगनात
फुला फळांनी समृद्ध निसर्ग श्रीमंत ।।२।।
सतारीच्या तारा बांधिल्या बंधनात
संयमाने प्रकट होई मधुर संगीत
जल वाहे सरितेचे तीरांच्या बंधनात
बहरत भूमी संयमाने सुपीकतेत ।।३।।
अग्नीने जलाची वाफ राही बंधनात
बद्ध होऊनी वसे प्रचंड शक्तीत
असावे जीवन सुंदर रसमय
राहोत सर्व जन संयमी तन्मय ।।४।।

**४४/१५ सतीश नी. केतकर, कल्याण**
**मोबा. : ९७६९५६२३१०**

* * * *

## खरंच का?

पहाटवारा प्रसन्नतेचा
चराचरावर छान झुले
मनात माझ्या गाणे होते
हे कैसे सकला कळले?
फुलांमधले रंग घेऊनी
छान फुलपाखरे उडाली
इंद्रधनुच्या रंगांनी मग
फुले कशी अवघी सजली
गंध कसा हा त्या फुलांचा
इंद्राघरचा जणू भासे
अलौकिकाचा दिव्यत्वाचा
भास त्यात हा खास असे
देवाघरची पखरण असता
काय कुणाला कमी कसले
नजरेच्या सोपानामधुनी
प्रतिबिंब मनाचे का उतरे?
चहूबाजूंना चहूदिशांना
भावनांचा रंग भरे
कल्पना ही नुसतीच असे की
खरोखरीचे हे घडले

१९/१४ सौ. उज्ज्वल र.बह्मांडकर

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession Register No. PCW/151/2014-2016**
**Licence to Post without Prepayment No.WPP - 22 at Market Yard P.S.O. on 25th of each Month and published on 25th of the month**

### पाऊस

पावसाचे आगमन देई आम्हा समाधान
भूमातेचे चरण स्पर्शुन नम्रभावे करी वंदन ॥१॥
पावसाचे आगमन देई आम्हा समाधान
मातेच्या उदरातून फुलवितसे अंकूर ॥२॥
पावसाचे आगमन देई आम्हा समाधान
विविधांगी देई अन्न, सुखी करी समाजजीवन ॥३॥
पावसाचे आगमन देई आम्हा समाधान
पक्षांचे सुस्वर ऐकवून, शांत करी अंत:र्मन ॥४॥
पावसाचे आगमन देई आम्हा समाधान
आबालवृद्धांचे मन, उत्साहाने टाकी भारून ॥५॥
पावसाचे आगमन देई आम्हा समाधान
वसुंधरेचे रुप लावण्य वेधुनी घेई आपुले लोचन ॥६॥

**द. श्री. विद्वांस, बदलापूर (पू.)**
**६०/१५ मो. ९४०३८७०८९५**

### काजवा

सह्याद्रीच्या कडेकपारी, अवघड आंबा घाट
जेष्ठ-आषाढी वळीव घेतो, निरोपाची वाट
किर्र अंधाऱ्या रात्री, झाडीत गर्द घनदाट
ओथंबल्या वळीवाच्या सरी, वाऱ्यासह घबराट
अंधेर-नगरीत बिजलीसह काजव्यांचा लखलखाट
दाही दिशातून आसमंती, चम्‌चम्‌ अचाट अफाट
छोटी झुडुपे, वृक्ष विशाल, अनुभवती दिवाळी
नजरेच्या सीमेतटी होई, काजव्यांची मांदियाळी.
नयनरम्य दृष्य पाहुनी, मन होई तृप्त
प्रकाशीत एक काजवा, जरी होता तो मृत

**४३/१५ प्रभाकर कानिटकर, कोल्हापूर**
**मोबा. : ९८८११९९१९९**

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 022-25446837 Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune 411030.Ph:020-24332141**

To,

**Publisher** – Shri. Vilas Vasudeo Gandhe, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.